रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १२०
www.ramprahar.com

शुक्रवार, १७ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नेरळमध्ये चोरट्यांचा डाव फसला; दोघांना पकडले/२

३०० रुपयांची लिपस्टिक पडली एक लाखाला/६

रायगडचा कुस्ती संघ राज्य स्पर्धेसाठी धाराशिवला रवाना/८

## बाळासाहेबांच्या स्मृतीस्थळी उबाठा कार्यकर्त्यांचा गोंधळ



**मुंबई :** हिंदुहृदयसम्राट दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनाच्या पूर्वसंध्येला अभिवादन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी (दि. १६) दादरमधील छत्रपती शिवाजी पार्क येथे आले होते. या वेळी उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे शिंदे समर्थक कार्यकर्तेही आक्रमक झाल्याचे दिसून आले. त्यामुळे बराच वेळ या ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. या वेळी शिवसेनेचे नेते नरेश म्हस्के यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, मुख्यमंत्री येथे अभिवादन करायला आले असता ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी राडा केला, महिलांनाही धक्काबुक्की केली. ही मंडळी बाळासाहेब, प्रबोधनकार यांचे संस्कार विसरले आहेत. आम्ही संयम पाळत आहोत, पण जर अशा प्रकारे आमच्या अंगावर याल तर शिंगावर घेऊ!

## आरक्षणावरून रस्सीखेच
### ओबीसी नेत्यांची आज जालन्यात सभा

**जालना : प्रतिनिधी**

मराठा समाजाला सरसकट ओबीसी कोट्यातून आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे-पाटील यांनी केली आहे, मात्र दुसरीकडे मराठा समाजाला हे आरक्षण देण्यास ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर जालन्यात शुक्रवारी (दि. १७) ओबीसी नेत्यांची जाहीर सभा होणार आहे. त्यामुळे आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा संघर्ष होण्याची शक्यता आहे.



मराठा समाजाला ओबीसीमधून सरसकट आरक्षण देण्याच्या मागणीसाठी जालन्यातील आंतरवाली सराटी गावात मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण केले होते. त्याच आंतरवाली सराटीपासून काही अंतरावर असलेल्या धाईत नगर येथील पाचोड रोडवर आरक्षण बचाव एल्गार सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेस मंत्री छगन भुजबळ, विरोधी पक्षनेते विजय वेडट्टीवार, माजी मंत्री पंकजा मुंडे, आमदार गोपीचंद पडळकर, रासपचे प्रमुख महादेव जानकर यांच्यासह राज्यभरातील ओबीसी नेते उपस्थित असणार आहे. 'जो ओबीसी हित की बात करेगा, वही देशपे राज करेगा' अशी टॅगलाईन या सभेसाठी देण्यात आली आहे.

जालना जिल्ह्यातील अंबडपाठोपाठ हिंगोली जिल्ह्यात ओबीसी समाजाची भव्य सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभादेखील विक्रमी होणार असल्याचा दावा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केला आहे. मारवाडी, जैन समाजातदेखील कुणबी नोंदी आढळत आहेत. मग त्यांनाही ओबीसीमध्ये घेणार का, असा सवालही शेंडगे यांनी केला आहे.

दरम्यान, ओबीसी सभेवर मनोज जरांगे-पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. लोकशाहीने सभा घेण्याचा सर्वांना अधिकार आहे. त्यामुळे कोणी सभा घेतल्यास आमची कोणतीही हरकत नाही. आमच्या आरक्षणाच्या मागणीला सर्वसामान्य ओबीसींचादेखील पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे आरक्षणाच्या मागणीसाठी आमचे शांततेत सुरू असलेले आंदोलन सुरूच राहणार असल्याचे जरांगे-पाटील यांनी म्हटले आहे.

# नवी मुंबई मेट्रो आजपासून धावणार
## बेलापूर-पेणधर मार्गावर सुरू होणार सेवा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

**नागरिकांचे हित लक्षात घेऊन त्यांची होत असलेली गैरसोय टाळण्याकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील बेलापूर ते पेणधर या मार्ग क्र. १वर १७ नोव्हेंबरपासून औपचारिकरित्या लोकार्पण सोहळा न करता मेट्रो प्रवासी सेवेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे नवी मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न पूर्ण होणार आहे.** (पान २ वर..)




### वेळापत्रक

मेट्रो सेवा १७ नोव्हेंबर रोजी पेणधर ते बेलापूर टर्मिनल आणि बेलापूर टर्मिनल ते पेणधरदरम्यान दुपारी ३ वाजता सुरू होऊन शेवटची फेरी ही रात्री १० वाजता असणार आहे, तर १८ नोव्हेंबरपासून पेणधर ते बेलापूर टर्मिनल आणि बेलापूर टर्मिनल ते पेणधरदरम्यान सकाळी ६ वाजता पहिली मेट्रो धावणार असून दोन्ही बाजूंकडून मेट्रोची शेवटची फेरी ही रात्री १० वाजता होणार आहे. मार्ग क्र. १वर दर १५ मिनिटांच्या अंतराने मेट्रो धावणार आहे.

### तिकिट दर

या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या तिकिटाचे दर हे अंतरानुसार असणार आहेत. त्यानुसार ० ते २ किमीच्या टप्प्याकरिता १० रुपये, २ ते ४ किमीकरिता १५ रुपये, ४ ते ६ किमीकरिता २० रुपये, ६ ते ८ किमीकरिता २५ रुपये, ८ ते १० किमीकरिता ३० रुपये आणि १० किमीपुढील अंतराकरिता ४० रुपये दर आहे.

### प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये

नवी मुंबई मेट्रो प्रकल्पात अत्याधुनिक रचनेचे वातानुकूलित डब्बे, मेट्रो स्थानकांच्या दोन्ही (उत्तर व दक्षिण) बाजूने आगमन (एन्ट्री) आणि निर्गमनाची (एक्झिट) व्यवस्था आहे. मेट्रो स्थानकांवर पार्किंगसाठी जागा, दिव्यांग प्रवाशांकरिता रॅम्प, पदपथ (फुटपाथ), ऑटो रिक्षांकरिता जागा, अखंड वीजपुरवठ्यासाठी यूपीएससह डिझेल जनरेटरची (डीजी) व्यवस्था, कॉनकोर्स आणि फलाटांवर प्रवासी घोषणा प्रणाली, सीसीटीव्ही, दिव्यांग व्यक्तींसाठी कॉनकोर्स स्तरावर विशेष स्वच्छतागृहांची व्यवस्था, कॉनकोर्स परिसरात व्यावसायिक वापराच्या दृष्टीने दुकानांकरिता जागा असणार आहे.



बहुप्रतिक्षित नवी मुंबई मेट्रो १७ नोव्हेंबर २०२३पासून नवी मुंबईकरांच्या भेटीला येत आहे. याबद्दल नवी मुंबईकरांचे हार्दिक अभिनंदन! नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी औपचारिक उद्घाटनाची वाट न बघता तातडीने मेट्रो सेवा सुरू करण्याचे निर्देश सिडकोला दिले होते. त्यानुसार १७ नोव्हेंबरपासून मेट्रो सेवेला प्रारंभ होत आहे, याबद्दल सिडकोचे अभिनंदन आणि नवी मुंबईकरांना शुभेच्छा! मेट्रोद्वारे नवी मुंबई अंतर्गत उत्तम कनेक्टिव्हिटी निर्माण होणार आहे. संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशामध्ये मेट्रो मार्गांचे जाळे निर्माण करण्याचे शासनाचे उद्दिष्ट असून नवी मुंबईमध्ये सिडकोतर्फे मेट्रोच्या अंमलबजावणीचे काम प्रभावीपणे सुरू आहे.

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

१७ नोव्हेंबर २०२३पासून नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १वरील बेलापूर ते पेणधरदरम्यान मेट्रो सेवा सुरू होत आहे. यानिमित्ताने नवी मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न साकार होत आहे. मेट्रोच्या रूपाने नवी मुंबईकरांना जलद, पर्यावरणपूरक आणि आरामदायी परिवहनाचा एक सक्षम पर्याय उपलब्ध होणार असून सीबीडी बेलापूरसह वेगाने विकसित होत असलेल्या खारघर, तळोजा नोड्सना मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभणार आहे. नवी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय शहर या लौकिकाला साजेशी उत्तम आणि सक्षम परिवहन व्यवस्था मेट्रोद्वारे निर्माण होणार आहे.

**-अनिल डिग्गीकर,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

## निवडक

### मुंबई, ठाणे, भिवंडी मनपा हद्दीत १२ दिवस पाणीकपात

**मुंबई :** येथील महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या पिसेस्थित न्यूमॅटिक गेट सिस्टिममधील एअर ब्लॅडर बदलण्याचे काम २० नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत हाती घेण्यात येणार आहे. या तातडीच्या दुरुस्ती कामामुळे मुंबईमधील आणि मुंबई महापालिकेतर्फे ठाणे, भिवंडी महानगरपालिकेस होणाऱ्या पाणीपुरवठ्यात १२ दिवस १० टक्के पाणीकपात करण्यात येणार आहे.

### गणपतीपुळे किनारी आलेल्या व्हेल माशाचा अखेर मृत्यू

**रत्नागिरी :** गणपतीपुळे येथील समुद्र किनाऱ्यावर आलेल्या बेबी व्हेल माशाचा अखेर मृत्यू झाला आहे. तब्बल तीन वेळा या माशाला समुद्रात सोडण्यात आले होते. बुधवारीदेखील खोल समुद्रात सोडल्यावर हा मासा समुद्र किनारी आला. तो बराच वेळ पाण्याबाहेर राहिल्याने त्याची प्रकृती चिंताजनक बनली होती. अखेर त्याची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.

## पुढील विधानसभा निवडणूक लढणार आणि तीदेखील नागपूरमधूनच!
### उपमुख्यमंत्री फडणवीसांकडून दिल्लीबाबतच्या चर्चांना पूर्णविराम

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून भाजप नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्लीला जाणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. त्याला अखेर फडणवीस यांनी पूर्णविराम दिला आहे. मी पुढील विधानसभा निवडणूक लढणार आणि तीदेखील नागपूरमधूनच, असे त्यांनी पत्रकारांसोबत अनौपचारिक गप्पा मारताना स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकांनी तिसऱ्या टर्ममध्येही बहुमताने २०२४च्या निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदींना निवडून आणण्याचे ठरवले आहे. कुणी कितीही प्रयत्न केला तरी लोक त्यांचा विचार बदलणार नाही. पत्रकारांनी पुढील दहा वर्षांत तुम्ही स्वतःला कुठे पाहता असे विचारल्यावर मी भाजपसोबतच राहिन आणि पक्ष मला देईल ती कोणतीही जबाबदारी



पार पाडू, असे उपमुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितले. त्याचसोबत नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार करण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्यात कायदा सुव्यवस्था राखणे याला प्राथमिकता आहे. मी सर्व मंत्र्यांना सांगितले, आपण मंत्री म्हणून राज्यात कुठेही तणावाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. मराठा समाजाला आरक्षण देणार, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले.

दरम्यान, राज्यातील महापालिका व अन्य निवडणुकांबाबत विचारणा केली असता सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने या निवडणुकांना विलंब होतोय, आम्हालाही महापालिकांच्या निवडणुका हव्यात, कारण ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालाचे पडसाद महापालिकेतही उमटतील. भाजप आणि सहकारी पक्ष एकनाथ शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत चांगले यश मिळवले आहे, याकडे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

दिवाळीनिमित्त शरद पवार-अजित पवार यांची भेट झाली. यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला असता राजकीय मतभेद असले तरी कौटुंबिक संबंध महत्त्वाचे असतात. कुणीही कुटुंबात राजकारण आणू नये, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## रायगड पोलिसांचे सागर कवच अभियान

**अलिबाग : प्रतिनिधी**

### सुरक्षा यंत्रणांचा घेणार आढावा

सागरी सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सागरी हद्दीत पोलीस, तटरक्षक, नौदल यांच्याकडून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. ऑपरेशन सागर कवच या अभियानाला गुरुवारी (दि. १६) सुरुवात झाली असून सलग ३६ तासांच्या मोहिमेत सागरी सुरक्षेचा आढावा घेण्यात येणार आहे.

२६/११च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस आणि सरकार सागरी सुरक्षेच्या बाबतीत अधिक जागरूक झाले. सागरी हद्दीत अनोळखी बोट दिसली तरी किनाऱ्यावर राहणाऱ्यांमध्ये घबराट पसरते. अशा परिस्थितीत मच्छिमारांनीही सागरी सुरक्षेसाठी सज्ज असावे ही गरज ध्यानी घेऊन सागर कवच अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सागरी हद्दीत पोलिसांकडून गुरुवार व शुक्रवार असे दोन दिवस ऑपरेशन राबवले जात असून यंत्रणा किती सक्षम आणि सतर्क आहे याची तपासणी होत आहे. रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग तालुक्यासह आसपासच्या सागरी हद्द व जवळच्या चेकपोस्टवर संशयित व्यक्ती व वाहनांची चौकशी होत आहे. शुक्रवारी संध्याकाळी ही मोहीम संपणार आहे.

सागर कवच अभियान अंतर्गत जिल्ह्यातील महत्त्वाच्या ठिकाणी तात्पुरत्या पोलीस चौक्या उभारण्यात आल्या आहेत, तर ७८ पोलीस अधिकारी, ५१८ पोलीस कर्मचारी आणि सागर सुरक्षा दलाचे २०० सदस्य या मोहिमेत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे ५७७ कर्मचारीही स्थानिक पोलिसांना मदतीला दिले गेले आहेत. या व्यतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक, आठ डीवायएसपी, १५ पोलीस निरीक्षक, ५१ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक या मोहिमेत सहभागी झाले आहेत.

## स्व. रामजी बेरा यांना अखेरचा निरोप


(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे खारघरमधील माजी नगरसेवक रामजी बेरा यांचे बुधवारी वयाच्या ५३व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सेक्टर १४ येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत गुरुवारी (दि. १६) शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी रामजी बेरा यांना श्रद्धांजली वाहिली.

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाहिली श्रद्धांजली

पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक ५चे भाजपचे नगरसेवक राहिलेले रामजी बेरा हे मितभाषी, दांडगा जनसंपर्क असणारे लोकप्रतिनिधी आणि यशस्वी उद्योजक होते. समाजातील दानशूर व्यक्ती म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांच्या निधनाने खारघरमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

रामजी बेरा यांच्या अंत्यसंस्कारावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, (पान २ वर..)

**पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक रामजी बेरा यांचे समाजकार्य खूप मोठे होते. त्यांच्या जाण्याने भारतीय जनता पक्ष तसेच बेरा परिवारामध्ये कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर त्यांच्या कुटुंबियांना देवो!**

**-प्रशांत ठाकूर, आमदार**

## 'महाराष्ट्र केसरी'चा धाराशिवमध्ये थरार

**धाराशिव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद आणि आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने ६५व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा थरार धाराशिव शहरात शुक्रवार (दि. १७)पासून रंगणार आहे. येथील तुळजाभवानी क्रीडा संकुलात जंगी कुस्त्यांचा फड पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. यासाठी राज्यभरातून ९५० मल्ल व ५५० पंच दाखल झालेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन, दुसऱ्या दिवशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती, तर अखेरच्या दिवशी माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण आणि स्पर्धेचा समारोप होणार असल्याची माहिती आयोजक सुधीर पाटील यांनी दिली.






**पनवेल : रायगड प्रीमियर लीगचे चौथे पर्व शिरढोण येथील मैदानात सुरू आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजप मावळ लोकसभा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले होते, तर या स्पर्धेला गुरुवारी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व उत्कृष्ट नियोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, दिनेश पाटील, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील माळी, साईचे माजी सरपंच विद्याधर मोकल, दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लीगचे आयोजक मंगेश वाकडीकर व सहकाऱ्यांनी मान्यवरांचे स्वागत केले.** (छाया : विकास म्हात्रे)

# मुंबई महापालिकेत आणखी एक घोटाळा

## भाजप नेते किरीट सोमय्यांचे उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्या प्रकारे आरबीआय नोटा छापते, त्या एक नोट असेल तर ती दुसऱ्याला देऊ शकतो. अशा प्रकारे बाजारात मुंबई महापालिकेच्या क्रेडिट नोट १० टक्के डिस्काऊंटने विकल्या जात आहेत. १८,६७५ कोटी कर्ज मुंबईकरांवर लादले. पाठच्या दारातून दुसऱ्या दिवशी क्रेडिट नोटचे पेमेंट सुरू झाले. या घोटाळ्याचा एक भाग मी आज तुमच्यासमोर ठेवत आहे. उद्या मी आणखी पत्रकार परिषद घेईन त्यात २० हजार कोटींचा प्रकल्पग्रस्तांचा घोटाळा समोर आणणार आहे. क्रेडिट नोटप्रकरणी महापालिका आणि महाराष्ट्र सरकारने आठवडाभरात निर्णय न घेतल्यास मला न्यायालयाचे दार ठोठावावे लागेल, असा इशारा देत भाजप नेते किरिट सोमय्यांनी उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप लावले आहेत.



किरीट सोमय्या म्हणाले की, कोविडच्या नावाने घोटाळे करणारे मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंचे नाव इतिहासात नोंद होईल. मार्च २०२२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि महापालिका आयुक्त इक्बाल चहल यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी घरे म्हणून अतुल चोरडिया, जयंत शहा आणि शाहीद बालवा यांना ३५ हजार घरांचे कंत्राट देण्याचा निर्णय घेतला, चार वर्क ऑर्डरही निघाल्या आणि यासाठी लागणारा पैसा क्रेडिट नोटने देण्याचे ठरवले.

१८६७५ कोटी क्रेडिट नोट देण्याचा करार केला, १० हजार घरांचे काम सुरू झाले. ४१५ कोटींच्या क्रेडिट नोटचा पहिला हफ्ता दिला गेला.

ट्रान्स्फरेबल क्रेडिट नोट हा नवीन प्रकार उद्धव ठाकरे आणि इक्बाल चहल यांनी अंमलात आणले. मी चार्टर्ड अकाऊंट, आजपर्यंत मी ट्रान्स्फरेबल क्रेडिट नोट हा शब्दच ऐकला नाही. पण उद्धव ठाकरे, इक्बाल चहल यांनी आणले असा आरोप त्यांनी केला.त्याचसोबत माझ्याकडे सगळे कागदपत्रे पुरावे आहेत. मुलुंडसाठी क्रेडिट नोट २८२६ कोटी, भांडूप ७४२ कोटी, प्रभादेवी ४५० कोटी, जुहू प्रकल्प ७२०० कोटी, चांदिवली १५ ते ८४ कोटी, हे प्रकल्प चोरडिया, शाह यांना देण्यात आले. त्यात कुणी पाटील नाही. मी क्रेडिट नोट संदर्भात पुढच्या चार दिवसांत अर्थमंत्री म्हणून अजित पवारांची भेट घेणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी माझी चर्चा झालीय. ईडी, इन्कम टॅक्स, महाराष्ट्र सरकार यांच्याकडे या घोटाळ्याची चौकशी करावी, अशी मागणी सोमय्या यांनी केली आहे.

दरम्यान, ४ मे २०२२ रोजी मुंबई महापालिकेच्या अर्थ विभागानेही या क्रेडिट नोटवर आक्षेप घेतला होता. महापालिकेच्या क्रेडिट नोट बाजारात विकल्या जातायेत, महापालिका आयुक्तांची चौकशी झाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. हे मुंबईला लुटण्याचे कटकारस्थान आहे. मुंबई महापालिकेची ५० हजार कोटींची फिक्स डिपॉझिट ही चहल आणि ठाकरेंना संपवायची होती असा आरोप सोमय्यांनी केला.

# ज्याच्या हातात तिजोरीच्या चाव्या तोच निघाला चोर!

## स्टेट बँक श्रीबाग शाखेच्या फसवणुकीत मॅनेजर सामील

**अलिबाग : प्रतिनिधी**

नियमात नसतानाही कर्ज मंजूर करणे, खोटे वेतन पत्रक देणे, असा गैरप्रकार करून अलिबाग शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया, श्रीबाग शाखेतील तत्कालीन शाखा व्यवस्थापक, क्षेत्रीय अधिकारी व कर्जदारांनी बँकेची ४१ लाख ६७ हजार ६६७ रुपयांची फसवणूक केली आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात २७ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये स्थानिकांसह ठाणे जिल्हा व गुजरात राज्यातील आरोपींचा समावेश आहे.

बँकेचे शाखा व्यवस्थापक संतोष यमगेकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार शैशव नलावडे हे २ जुलै २०१८ ते २४ मे २०२१ या कालावधीत श्रीबाग येथील स्टेट बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम पहात होते तर, अमिताभ गुंजन हे क्षेत्रीय अधिकारी म्हणून होते. श्रीबाग एसबीआय शाखेचे ऑडिट २६ मे २०२२ रोजी पुणे येथील ऑडिट विभागाकडून झाले. त्यामध्ये नलावडे आणि गुंजन या दोघांनी मिळून एक्स्प्रेस क्रेडिट लोन या योजनेंतर्गत ६५ जणांना वेगवेगळ्या रकमेचे कर्ज मंजूर केल्याचे निर्दशनास आले. त्यामध्ये कर्जदार कर्ज मंजूर करण्याच्या कोणत्याही नियमात बसत नसतानाही त्यांचे कर्ज मंजूर झाल्याचे आढळून आले. खोटे वेतन पत्रक, बँक स्टेटमेंट देऊन त्यांच्याकडूही दिशाभूल करून वैयक्तिक कर्ज मिळवल्याचे निष्पन्न झाले. यातील ३८ जणांनी कर्जाची रक्कम पूर्ण भरून त्यांचे कर्जाचे खाते बंद केले. त्यापैकी २७ जणांनी खोटे दस्तऐवज देऊन कर्ज मिळविले.

या २७ जणांची कोणतीही पडताळणी न करता कर्ज मंजूर करण्यामध्ये तत्कालीन शाखा व्यवस्थापक नलावडे व फिल्ड व्यवस्थापक गुंजन यांनी संगनमताने बँकेची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. हा प्रकार या सर्वांनी २०१८पासून २०२१ या कालावधीत केल्याची तक्रार यमगेकर यांनी केली आहे.

**श्रीबागमधील स्टेट बँकेचे तत्कालीन शाखा व्यवस्थापक, फिल्ड ऑफिसर व २७ कर्जदारांविरोधात फसवणूक केल्याबाबत तक्रार नोंदवण्यात आली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. अद्याप कोणाला ताब्यात घेण्यात आलेले नाही.**
**–शिरीष पवार,**
**पोलीस निरीक्षक, अलिबाग**

**बँकेच्या ऑडिटमध्ये खोटे दस्तऐवज देऊन कर्ज मिळवणे, तत्कालीन शाखा व्यवस्थापक व फिल्ड ऑफिसर यांनी कोणतीही पडताळणी न करता संगनमताने कर्ज दिल्याचे निष्पन्न झाले आहे. बँकेची ४१ लाख रुपयांची फसवणूक झाल्याबाबत २७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**
**– संतोष यमगेकर, शाखा व्यवस्थापक**


# नेरळमध्ये चोरट्यांचा डाव फसला!

## चोरी करण्याअगोदरच ग्रामस्थांनी घेरले; एकाचे पलायन

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ–अंबिवली येथील बंद असलेले बंगले फोडून चोरी करण्यास आलेल्या अट्टल चोरांना येथील जागरूक नागरिकांनीच पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

बंद बंगल्याच्या आतून येथील सुरक्षारक्षकाला आवाज आल्याने सुरक्षारक्षकाने गावातील नागरिकांना माहिती दिली आणि गावातील तरुणांनी बंगल्याला घेराव घातला. या वेळी चोर पळून जात असतानाच ग्रामस्थांनी दोघा जणांना पकडले, मात्र एक चोर पळून जाण्यास यशस्वी ठरला.



नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या जिते–अंबिवली या पेशवाई मार्गावर मुंबईस्थित नागरिकांचे बंगले आहेत. हे बंगले बंद असून येथे सुरक्षेच्या दृष्टीने बंगला मालकाने येथील स्थानिक नागरिकांना देखभालीसाठी सुरक्षारक्षक म्हणून कामावर ठेवले आहे. गुरुवारी (दि. १६) दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तीन अज्ञात चोरट्यांनी येथील एक बंद बंगला लुटण्याचा प्रयत्न केला. यासाठी चोरांनी चोरीसाठी लागणारे साहित्य बॅगमध्ये भरून आणले होते. बंगल्याला असणाऱ्या खिडक्यांच्या काचा फोडून या चोरट्यांनी बंगल्यात प्रवेश केल्याचे सांगण्यात आले.

येथील देखभाल करणाऱ्या सुरक्षारक्षकाला बंद असणाऱ्या बंगल्यातून आवाज येत असल्याने सावध भूमिका घेत स्थानिक ग्रामस्थाना माहिती दिली आणि जागरूक नागरिकांनी बंगल्याला घेराव घालून पळून जाणाऱ्या दोन चोरांना पकडले.

यात एक चोर बाहेर लपून बसला असल्याने तो पळून जाण्यात यशस्वी ठरला. त्या दोघांना नागरिकांनी पोलिसांच्या ताब्यात दिले.

### राज्य नाट्य स्पर्धा २१ नोव्हेंबरपासून

**नांदेड** : सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई आयोजित राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा नांदेड केंद्रावर २१ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत, कुसुम सभागृह नांदेड येथे रोज सायंकाळी ७ या वेळेत होणार आहे.

या स्पर्धेत नांदेड आणि परभणी अशा दोन जिल्ह्यातून एकूण १२ नाट्यप्रयोग सादर होणार असून त्यानंतर ४ डिसेंबरपासून नांदेडशी संलग्न असलेले लातूर येथील उपकेंद्रावर १२ नाट्यप्रयोग सादर होणार आहेत. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार व सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा होणार असल्याचे विभागाचे संचालक विभीषण चवरे यांनी नमूद केले.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गडचिरोलीतील सीआयआयआयटी केंद्राचे लोकार्पण

**गडचिरोली : प्रतिनिधी**

जिल्ह्यात उद्योगाधारित प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास करण्यासाठी राज्य शासन, जिल्हा प्रशासन व टाटा टेक्नालॉजी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सेंटर फॉर इन्व्हेंन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अ‍ॅण्ड ट्रेनिंग सेंटर (सीआयआयआयटी)चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बुधवारी (दि. १५) लोकार्पण करण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञान, उपकरणांनी सुसज्ज अशा या प्रशिक्षण केंद्राची मुख्यमंत्री शिंदे यांनी पाहणी करून माहिती घेतली.



या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून केवळ मुलांचे प्रशिक्षणच होणार नाही तर गडचिरोलीसारख्या जिल्ह्यातून उद्योजक तयार होतील आणि एकूणच गडचिरोलीच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास या वेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे सेंटर सुरू झाल्यामुळे गडचिरोलीमधील युवकांना प्रशिक्षण व रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. गडचिरोली जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यामध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्यावर भर देत आहे. रस्ते, रेल्वे अशा दळवळणाच्या सुविधा, मोबाईल नेटवर्कबाबत वेगाने कार्यवाही सुरू असून आम्ही जिल्ह्यामध्ये विमानतळ विकसित करून हवाई मार्गाने गडचिरोली जिल्ह्याला जोडण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या प्रशिक्षण केंद्रात उद्योग जगताच्या गरजेनुसार अत्याधुनिक तांत्रिक कौशल्य विकासाच्या संदर्भात विद्यार्थ्यांना नऊ वेगवेगळ्या तांत्रिक प्रयोग शाळांच्या माध्यमातून प्रशिक्षित करण्यात येणार आहे. या केंद्राची अंमलबजावणी जिल्हाधिकारी, गडचिरोली तसेच गोंडवाना विद्यापीठ यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये आधुनिक यांत्रिक उपकरणे, रोबोटिक लाईन, असेंबली लाईन, विद्युत आधारित वाहने वाहनांचे विविध भाग यांच्या डिझाईन व उत्पादन याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# जरांगे-पाटील यांच्या आंदोलनावर राज ठाकरेंची टिपण्णी

**ठाणे : प्रतिनिधी**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे–पाटील सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे आंदोलन राज्यात चर्चेचा विषय असताना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावर वेगळीच शंका व्यक्त केली आहे.

मनसे नेते राज ठाकरे म्हणाले की, मी जेव्हा मनोज जरांगे–पाटील यांना भेटलो होतो तेव्हा अशा प्रकारे आरक्षण मिळणार नाही असे मी बोललो होतो, परंतु आता जरांगे–पाटील आहेत की त्यांच्यामागे कोण आहे? त्यातून महाराष्ट्रात जातीय तेढ निर्माण करायचे असे आहे का? कारण निवडणुकीच्या तोंडावर या सगळ्या गोष्टी होतायेत. हे इतके सरळ चित्र दिसत नाही. त्यामुळे कालांतराने यामागे कोण आहे हे कळेलच.

जात ही गोष्ट अनेकांना प्रिय असते. स्वतःच्या जातीबद्दल अभिमान असणे हे होत होते महाराष्ट्रात, पण दुसऱ्याच्या जातीबद्दल द्वेष निर्माण करणे हे राष्ट्रवादीच्या जन्मानंतर महाराष्ट्रात सुरू झाले. यांच्या स्वार्थापायी आपण महाराष्ट्र खड्डयात घालतोय. माझ्यासाठी माणूस महत्त्वाचा. मी जात पात मानत नाही, असे म्हणत राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा शरद पवार यांच्यावर हल्लाबोल केला.

हवा आणि ध्वनिप्रदूषणामुळे कोर्टाने दिवाळीत फटाके वाजण्यासंदर्भात निर्देश दिले होते. त्यावर राज ठाकरे यांनी नाराजी व्यक्त केली. आता फटाके कधी वाजवायचे, सण कसे साजरे करायचे हे पण कोर्ट ठरवणार का, असा सवाल राज यांनी उपस्थित केला. मराठी पाट्यांचा मुद्दाही त्यांनी या वेळी मांडला.

पान १ वरुन

### आजपासून धावणार नवी मुंबई मेट्रो

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईमधील सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून नवी मुंबई मेट्रो प्रकल्प साकारण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण चार उन्नत मार्ग विकसित करण्यात येत असून सिडकोतर्फे प्रथम बेलापूर ते पेंधर या ११.१० किमी लांबीच्या मार्ग क्र. १चे काम हाती घेण्यात आले होते. या मार्गावर एकूण ११ स्थानकांसह तळोजा पाचनंद येथे आगार (डेपो) आहे.

मार्ग क्र.१ची अंमलबजावणी करण्याकरिता अभियांत्रिकी सहाय्य म्हणून सिडकोतर्फे महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली होती. या मार्गावर धावणाऱ्या मेट्रोच्या ऑसिलेशन, विद्युत सुरक्षा, ईमर्जन्सी ब्रेक इ. चाचण्या यशस्वीरीत्या झाल्या व त्याबाबतचे प्रमाणपत्रही संबंधित यंत्रणांकडून प्राप्त झाले. त्यानंतरर मेट्रोच्या वाणिज्यिक परिचालनाकरिता सर्वांत महत्त्वाचा टप्पा असलेली सीएमआरएस (मेट्रो रेल सुरक्षा आयुक्त) यांच्यातर्फे करण्यात आलेली चाचणीदेखील यशस्वीरीत्या होऊन या मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्याकरिता सीएमआरएस यांचे प्रमाणपत्रही प्राप्त झाले असून १७ नोव्हेंबरपासून मेट्रो सेवा सुरू होणार आहे.

### स्व. रामजी बेरा यांना अखेरचा निरोप

खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, ब्रिजेश पटेल, किर्ती नवघरे, वासुदेव पाटील, प्रभाकर जोशी, किरण पाटील, अमर उपाध्याय यांच्यासह त्यांना मानणारा वर्ग आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी रामजी बेरा यांचे अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

## खोपोलीतील केएमसी कॉलेजतर्फे दरडग्रस्त इर्शाळवाडीत फराळ, भेटवस्तू वाटप

**चौक : प्रतिनिधी**

केएमसी महाविद्यालय खोपोलीमार्फत इर्शाळवाडीच्या दुर्घटनाग्रस्त चिमुकल्यांना दिवाळी भेटवस्तू व फराळ वाटप नुकताच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आला.



कार्यक्रमास महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष दिलीप पोरवाल, प्राचार्य डॉ.प्रताप पाटील, कॉमर्स विभागप्रमुख डॉ.विनायक गांदल यांचे मार्गदर्शन लाभले. या वेळी चौक ग्रामपंचायत सरपंच रितू ठोंबरे उपस्थित होत्या.

कार्यक्रमास प्रा. मुळीक, डॉ. पंचगले, प्रा. भिसे, डॉ. मगर, प्रा. हिरवा, प्रा. होजगे तसेच एनएसएस प्रतिनिधी सुशांत म्हसे, आनंद गोसावी, नरेश शिंगवा, माजी विद्यार्थी उमेश शिंगावा, काशिनाथ शिंगावा उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन एनएसएस विभागप्रमुख डॉ. ए. बी. पाटील, प्रा. संजय डायरे व प्रा. ओमकार खंडागळे यांनी केले.

# ठाण्यात १९ नोव्हेंबरपासून कोकण महोत्सव

**ठाणे : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना स्वातंत्र्यवीर सावरकरनगर विद्यमाने यंदा १९ ते २६ नोव्हेंबरदरम्यान भव्य स्वरूपाच्या कोकण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवसेना गटनेते व माजी नगरसेवक दिलीप बारटक्के यांनी आयोजित केलेल्या या कोकण महोत्सवाचे यंदा १६ वे वर्ष असून विविध प्रकारच्या १६ कार्यक्रमांचा यात समावेश आहे.



सावरकरनगर येथील ठामपा शाळा क्र.१२०च्या मैदानात दररोज सायंकाळी ५ ते रात्री १० दरम्यान होणाऱ्या या महोत्सवात पाच पारंपरिक दशावतार नाटके, कोकण काव्योत्सव, आदिवासी नृत्य, कोकणरत्न पुरस्कार, खेळ पैठणीचा, वेशभूषा स्पर्धा, पाककला स्पर्धा, नृत्य स्पर्धा, गुणवंत विद्यार्थी सत्कार, मुलांसाठी फनफेअर, खाद्यपदार्थांचे स्टॉल तसेच शासकीय योजनांची माहिती देणारे स्टॉल्स असतील.

झणझणीत म्हावरा, अस्सल चवीचो मालवणी मसालो, खडखडे लाडू, मालवणी खाजा, कुळदाची पिठी, सुकी मच्छी, मासे, कोकम, कोकणातील पर्यटन, काजू, आंबा अशा स्टॉलचा समावेश आणि सेलिब्रिटिंची विशेष उपस्थिती असणार आहे. विशेष आकर्षण असणाऱ्या श्री क्षेत्र भरणे खेड येथील श्री काळकाई देवी मंदिराची प्रतिकृती महोत्सवस्थळी साकारण्यात आली आहे.

कोकण महोत्सवाला प्रारंभावेळी श्री कलेश्वर नाट्यमंडळ दशावतार, २० नोव्हेंबरला आदिवासी तारफा नृत्य आणि पारंपरिक नृत्याचा नजराणा, सेलिब्रिटी गौरी पवार, २१ नोव्हेंबर वेशभूषा स्पर्धा, जय हनुमान पारंपरिक दशावतार, २२ नोव्हेंबर पाककला स्पर्धा, शासनाच्या विविध योजनांची माहिती, जितू दादा प्रस्तुत पैठणी कार्यक्रम, सेलिब्रिटी रंजीता पाटील, २३ नोव्हेंबर रोजी एव्हीए हा आगळा वेगळा फॅशन शो, बिग बॉस फेम डॉ. रोहित शिंदे, चेंदवणकर पारंपरिक नाट्य मंडळ दशावतार, २४ नोव्हेंबरला कोकण–काव्योत्सव, कलेश्वर पारंपरिक नाट्यमंडळ दशावतार, २५ नोव्हेंबर सोलो व ग्रुप नृत्य स्पर्धा श्री आशिमिक महाराष्ट्र लावणी सम्राट विजया शिंदे, २६ नोव्हेंबर कोकण रत्न पुरस्कारांचे वितरण, विद्यार्थी गुणगौरव सोहळा, किल्ले पुरस्कार, अमृतनाथ नाट्यमंडळ दशावतार असे भरगच्च कार्यक्रम होतील. या महोत्सवास येण्याचे आवाहन दिलीप बारटक्के यांनी केले आहे.

# मुरुडच्या लक्ष्मीखार परिसरात गढूळ पाणी

## उलटी व जुलाबाच्या त्रासाने ग्रामस्थ हैराण

**मुरुड : प्रतिनिधी**

शहरातील लक्ष्मीखार परिसरात २ नोव्हेंबरपासून गढूळ पाणीपुरवठा होत आहे. या पाण्यामुळे येथील ग्रामस्थांना उलटी, जुलाबाचा त्रास होण्यास सुरुवात झाली आहे. शहराला जलशुद्धीकरण प्रकल्प आहे. मग हा प्रकल्प प्रकल्प सुरू असेल तर मग गढूळ पाणी का येत आहे? याबाबत नगर परिषदेने खुलासा करावा, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे.

याबाबत येथील मनीष माळी यांनी सांगितले की, आंबोली अथवा गारंबी धरणातील पाणी दूषित असेल तर लाईन बंद करणे हा उपाय नाही. शहराला जलशुद्धीकरण केंद्र असताना लोकांना हा त्रास सहन करावा लागत आहे. याचा अर्थ जलशुद्धीकरण केंद बंद असावे. जलशुद्धीकरण केंद्राला फक्त रंगरंगोटी केली, परंतु ते सुरू आहे किंवा कसे याबाबत नगर परिषदेने प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवण्याची मागणी त्यांनी केली.

लक्ष्मीखार, दस्तुरी नाका, जुनी पेठ, खाजण विभागालासुद्धा गढूळ पाण्याचा पुरवठा झाला आहे.अद्यावत यंत्रणा असताना शहरातील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होणे धोकदायक असल्याचेही त्यांनी सांगितले.

# शॉर्टसर्किटमुळे दोन ठिकाणी घरांना आग

## रिटघरमध्ये सामान जळून खाक

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील रीटघर गावात एका घराला बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत घरातील मौल्यवान वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून कुठलीही जीवितहानी झाली नाही आहे.

येथील काशिनाथ कानू पाटील हे आपल्या कुटुंबियांसमवेत झोपलेले असताना त्यांच्या घराला अचानक आग लागली. ही आग शॉटसर्किटमुळे लागली असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शेजाऱ्यांच्या सतर्कतेमुळे घरातील व्यक्तींना सांगितल्याने सर्व घराबाहेर पडले तसेच तातडीने तालुका पोलीस ठाण्याशी संपर्क साधून त्यांना माहिती देण्यात आली.

तत्परतेने अग्निशामक दलाचे बंब घटनास्थळी पोहचले व स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. या आगीत घरातील मौल्यवान वस्तूंचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही आहे.



## रिस येथील कुटुंब बालंबाल बचावले

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी रिस येथे मुख्य रस्त्यावर असणाऱ्या शरायू बिअर शॉपीजवळ शंकर बुधाजी टेंबे यांच्या घराला शॉटसर्किटमुळे आग लागल्याने घरातील वस्तू जळून खाक झाल्या.

मिळालेल्या माहितीनुसार टेंबे यांच्या पहिल्या मजल्यावर भाड्याने राहणारे बालाजी राठोड, सरिता राठोड हे कुटुंब राहते. हे कुटुंब रोजंदारीसाठी कामाला गेले असताना ११ वा. च्या सुमारास घरामध्ये शॉटसर्किटमुळे अचानक आग लागली. धूर दिसल्यामुळे जवळपासच्या नागरिकांनी पाताळगंगा अग्निशामक दलाला पाचारण केले.

अग्निशामक दलाचे राकेश पाटील, संजय पवार, अंकुश पाटील, सुयोग भोईर, राहुल पाटील यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत आग विझवली. घरात असलेल्या टीव्ही, सिलिंग फॅन, कुलर, टेबल, खुर्ची, कपडे या वस्तू जळून खाक झाल्या होत्या.

या घटनेची माहिती मिळताच भूषण पारंगे, पोलीस पाटील महेश जांभळे, माजी सरपंच दिनकर म्हात्रे यांनी या ठिकाणी भेट देवून पाहणी केली.

# पनवेल-सायन महामार्गावर ट्रक-मिक्सरचा अपघात

## एकजण गंभीर जखमी; महामार्ग तासभर ठप्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-सायन मार्गावर गुरुवारी (दि. १६) दुपारी उड्डाणपुलावर ट्रक व मिक्सरच्या झालेल्या अपघातात एक वाहनचालक गंभीर जखमी झाला आहे. येथून जाणाऱ्या एका ट्रकने अचानक ब्रेक दाबल्याने मागून येणारे मिक्सर ट्रकला धडकले. त्यात मिक्सरचालक गंभीर जखमी झाला आहे. या अपघातामुळे सुमारे एक तास पुण्याकडे जाणारी वाहतूक ठप्प झाली होती.

गुरुवारी २.३० ते ३ वा.च्या दरम्यान पनवेल-सायन मार्गावर उड्डाणपुलावरून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या एका ट्रकने अचानक ब्रेक दाबला. मागून येणाऱ्या मिक्सर ट्रक चालकाला गाडी थांबवता न आल्याने मिक्सरने ट्रकला मागून जोरदार धडक दिली. मिक्सरसमोरच्या बाजूने मोठे नुकसान झालेच शिवाय चालक गंभीर जखमी झाला आहे. त्याला डॉ. डी. वाय पाटील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे.



अपघातग्रस्त दोन्ही गाड्या बंद पडल्या होत्या. त्यामुळे वाहतूक कोंडी प्रचंड झाली. त्यामुळे अपघातग्रस्त गाड्या उड्डाणपुलावरून खाली काढून रस्त्याच्या कडेला घेण्यास अडचणी निर्माण होत होत्या. शेवटी सर्वच मार्गिकेवरील वाहतूक काही वेळ बंद करून दोन्ही गाड्या टोईंगने बाजूला काढून तासाभराने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

गाड्या बाजूला करेपर्यंत पूर्ण वाहतूक बंद न ठेवता उड्डाणपुलाखालून वाहतूक सुरू करण्यात आली, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत धरणे यांनी दिली.

# वीर वाजेकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचा दिवाळी उपक्रम

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयामधील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही चिरनेर येथील अक्काईवाडी परिसरातील आदिवासी पाड्यातील मुले, बंधू-भगिनींना दिवाळी फराळ, खाऊ व कपडे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. डॉ. संदीप घोडके यांच्या पुढाकाराने कॉलेजच्या राज्यशास्त्र विद्यार्थ्यांनी स्वतःकडील दिवाळी फराळ, फळे व कपड्यांचे वाटप उस्फूर्तपणे केले. यामुळे चिमुकल्यांचा चेहऱ्यावर आनंद पसरला. याबरोबरच डॉ. संदीप घोडके यांच्या संकल्पनेतनुसार फटाकेमुक्त व पर्यावरणयुक्त दिवाळी साजरी करण्याकरिता आदिवासीपाड्यातील नागरिकांना आग्रही आवाहन करण्यात आले.



विभागाच्या वतीने गेली अनेक वर्षापासून डॉ. संदीप घोडके यांच्या प्रयत्नानुसार हा उपक्रम निरंतर चालू आहे.

## पनवेल पोलिसांनी शिल आश्रमात घेतला स्नेहभोजनाचा आस्वाद

**पनवेल : वार्ताहर**

दिवाळी सणाचे औचित्य साधून तसेच नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील शिल आश्रम, वांगणी या ठिकाणी पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन वृद्ध, दिव्यांग, लहान मुलांसोबत स्नेहभोजन तसेच फराळ आस्वाद तसेच वाटप केले.

या वेळी सहाय्यक पोलीस आयुक्त, पोर्ट विभाग धनाजी क्षीरसागर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगदीश शेलकर, निरीक्षक (वाचक) पृथ्वीराज घोरपडे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यानिमित्ताने या आश्रमाच्या व्हीटोने नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना दीर्घायुष्य लाभावे यासाठी विशेष प्रार्थनासुद्धा करण्यात आली.



## ‘आमचं ठरलंय’ दिवाळी पहाट कार्यक्रमाला पनवेलकरांचा प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

मंदार काणे एंटरटेनमेंट आणि प्रिया इव्हेंट्स आयोजित फडके नाट्यगृह पनवेल येथे झालेल्या आमचं ठरलंय या दिवाळी पहाट प्रथमेश लघाटे आणि मुग्धा वैशंपायन या कार्यक्रमासाठी रसिकप्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजप महासचिव महाराष्ट्र प्रदेश आणि पनवेलचे माजी उपमहापौर महानगरपालिका विक्रांत पाटील, भाजप पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत, रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेना महानगर संघटक आणि माजी नगरसेवक प्रथमेश सोमण, लोकमान्य मल्टीपर्पज को. ऑप. बँक लिमिटेडचे पनवेल शाखेचे सहव्यवस्थापक मयूर निजामपूरकर, चितळे एक्सप्रेस पनवेलचे पुष्कर कर्वे आणि अर्बन बँकच्या संचालिका माधुरी गोसावी त्याचसोबत डिजिटल पार्टनर म्हणून स्मृतिगंध या सर्वांचा सत्कार आयोजक मंदार काणे यांच्यातर्फे करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मंगला खाडिलकर यांनी सूत्रसंचालन केले तर वादकांची टीम अमेय ठाकूर देसाई यांची होती. त्याचसोबत उत्तम ध्वनिव्यवस्था देणारे सर्वेश गोखले आणि नाट्यगृह उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थापक राजेश डोंगरे आणि महापालिका तसेच सर्व पत्रकार मान्यवर मंडळी, नाट्यगृह कर्मचारी आणि रसिकप्रेक्षकांचे मंदार काणे यांनी आभार मानले आहेत.






**नवीन पनवेल : दीपावलीनिमित्त राजे शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने देवगिरी किल्ल्याची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या ठिकाणी भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. राजे शिवराय प्रतिष्ठानच्या पनवेल शाखेचे संजय पाटील यांच्यासह सदस्यांनी त्यांचे स्वागत केले. देवगिरी किल्ल्याची प्रतिकृती पाहून नागरिक आनंद व्यक्त करीत आहेत.**

# उरण येथे मोफत वैद्यकीय शिबिर

**उरण : वार्ताहर**

आयएनएचएस संधानी आणि नौदल स्टेशन यांच्या वतीने गुरुवारी (दि. १६) नौदल दिनानिमित्त उरण एज्युकेशन सोसायटी इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनियर कॉलेज येथे वैद्यकीय शिबिर झाले.

भारतीय नौदलाच्या आयएनएचएस संधानी आणि आयएनएचएस अश्विनी रुग्णालयांकडून औषध, शस्त्रक्रिया, स्त्रीरोग, बालरोग, त्वचाविज्ञान, कान, नाक, घसा, नेत्ररोग आणि दंतचिकित्सा याबाबत रुग्णांना सल्ला देण्यात आला. औषध वाटप व चष्म्याचे वाचन करण्यात आले. आरएचसी, उरण यांच्या सहकार्याने रक्त तपासणीही करण्यात आली.



शिबिराचे उद्घाटन सर्जन रिअर ॲडमिरल विवेक हांडे, व्हीएसएम यांच्या हस्ते झाले. सर्जन कॅप्टन सौरभ भुतानी, आयएनएचएस संधानीचे कमांडिंग ऑफिसर यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, उरण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तनसुख पी. जैन व प्राचार्या सिमरन दहिया यांचीही उपस्थिती होती. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## खारघरमध्ये बांगलादेशी पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

खारघर परिसरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकाला खारघर पोलिसांनी अटक केली. गौस हक्कामिया शेख (वय ३१) असे त्याचे नाव आहे.

खारघर सेक्टर-३४ मधील मॅजिस्टेट व्हिला इमारतीत बांगलादेशी नागरिक विनापासपोर्टशिवाय राहत असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार हवालदार संजय मोरे व शिपाई मच्छिंद्र पाटील यांनी शनिवारी मॅजिस्टेट व्हिला इमारतीत गौस हक्कामिया शेख याला अटक केली आहे.

**पनवेल : कामोठे सेक्टर ३६ येथे फन टाइम इनडोअर फनझोनचे उद्घाटन महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी फनटाइमचे मालक निखिल डोळस, सौ. डोळस यांच्यासह त्यांचे सहकारी आणि कुटुंबीय उपस्थित होते. सर्व मुलांनी बालदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा आणि उपक्रमांचा आनंद लुटला.**





पनवेल : छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार तसेच त्यांच्या शौर्याचे प्रतीक असलेले किल्ले हे तरुण पिढीला नवीन उर्जा देतात. महाराजांचे विचार हे आजच्या पिढीपर्यंत पोहचावे यासाठी सुकापूर साक्षी पार्क २मध्ये जम्नोत्री सागर सोसायटीतील मुलांनी प्रतापगडाची प्रतिकृती साकारली आहे.

## किल्ले उभारणी स्पर्धेत साकारली लोहगड प्रतिकृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळी म्हटली की, फटाके, फराळ याव्यतिरिक्त किल्ले उभारण्याचीदेखील परंपरा प्रचलित आहे. शहरी भागात ही परंपरा लुप्त होत चालली असली तरी ग्रामीण भागात आजही मातीचे किल्ले उभारले जातात. बच्चेकंपनी याकरिता पुढाकार घेत असते.

पनवेल तालुक्यातील चिंचवण गावात बच्चेकंपनीने साकारलेल्या लोहगड किल्ल्याच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला आहे.गावात आयोजित स्पर्धेत जवळपास २२ जणांनी सहभाग घेतला होता.

यामध्ये गौरव पोपेटा, जय पोपेटा, नयन पाटील, सर्वेश पाटील या विद्यार्थ्यांनी साकारलेल्या लोहगडाच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला. गडावरील विंचूकडा तसेच विविध वास्तू या मुलांची बारकाइने साकारले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देत या विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने हा किल्ला साकारला आहे.



शहरात आजही अपली परंपरा, आपला इतिहास जपण्यासाठी आजची तरुण पिढीही प्रयत्न करीत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.



**पनवेल : प्रसिद्ध कलाकार, मधुबनी पेंटिंगच्या डिझायनर आणि ट्रेनर मुन्नी कुमारी मीनू यांनी राज्य व कलामणी पुरस्कारप्राप्त मिथिला पेंटिंग महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना प्रदान केली. या पेंटिंगमध्ये भगवान ब्रह्मा आणि विष्णू यांच्या उपस्थितीत शिव आणि पार्वतीचा विवाह दर्शविला आहे. या वेळी मुन्नी कुमारी मीनू यांच्यासोबत मुली खुशबू, प्रिया, कायस्थ, प्रियांका आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# रणांगण कुणाचे?

ऐन दिवाळीच्या मोसमात देशातील पाच राज्यांमध्ये निवडणुकांच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. या प्रचाराचा कळस दिवाळीच्या शेवटच्या दिवशी मध्य प्रदेशात गाठला गेला. आज शुक्रवारी तेथे मतदान पार पडेल.

**मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान पुन्हा एकदा निवडणुकीत बाजी मारण्याच्या तयारीत दिसत आहेत. काँग्रेसचे कमलनाथ आणि दिग्विजय सिंह या माजी मुख्यमंत्र्यांच्या जोडीने घणाघाती प्रचाराची राळ उठवून तेथील वातावरणात चुरस निर्माण केली खरी, परंतु चौहान यांच्या करिष्म्यापुढे त्यांची डाळ शिजणे कठीणच आहे. याशिवाय खुद्द पंतपधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी प्रचंड मोठी ताकद चौहान यांच्या पाठिमागे उभी केली आहे. २०१८मधील निवडणुकीत चौहान यांचा निसटता पराभव झाला होता. काँग्रेसने नाना खटपटी करून त्यांच्या हातून सत्ता हिसकावून घेतली, परंतु काँग्रेसची ही सत्ता जेमतेम सव्वा वर्ष टिकली, कारण मध्य प्रदेशातील मातब्बर नेते ज्योतिरादित्य शिंदे यांनी काँग्रेसची साथ सोडून भाजपशी घरोबा केला. त्यानंतर चौहान पुन्हा मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. हा पंधरा महिन्यांचा काळ वगळता ते सलग १८ वर्षे मुख्यमंत्रीपदी आहेत. यंदादेखील त्यांचेच पारडे जड आहे, कारण त्यांनी राबवलेल्या अनेक विधायक योजनांची फळे राज्यातील जनतेला प्रत्यक्ष चाखायला मिळाली आहेत. मध्य प्रदेशातील लाडली बहना योजना देशभरात नावाजली गेली. या योजनेमध्ये समाविष्ट झालेल्या महिलांना लखपती बनवण्याची किमया चौहान यांच्या सरकारने करून दाखवली आहे. तथापि, या योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या सर्वच महिलांचा समावेश लाभार्थी म्हणून केला जाईल अशी घोषणा चौहान यांनी केल्याने काँग्रेसचे धाबे दणाणले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे मध्य प्रदेशातील सर्व २३० मतदारसंघांमध्ये मिळून सुमारे साडेपाच कोटी मतदार आहेत. त्यातील निम्म्या संख्येने महिला मतदार आहेत. याशिवाय मध्यप्रदेशात आदिवासींची संख्यादेखील जवळपास २० टक्के आहे. पंतप्रधान मोदी यांची धोरणे या आदिवासी समाजाला आजवर वरदान ठरली असल्याने त्यांची लोकप्रियता प्रचंड आहे. गेल्याच महिन्यात आदिवासी राणी दुर्गावती यांची पाचशेवी जयंती पंतप्रधान मोदी यांनी धुमधडाक्यात साजरी केली होती. याउलट काँग्रेसमधील गटातटाचे राजकारण उघड्यावर आले आहे. दिग्विजयसिंह यांनी प्रचारात जोर लावला तो आपले पुत्र जयवर्धन यांचे स्थान भक्कम करण्याच्या इराद्याने. त्यांच्या राजकारणाचा आणि मध्य प्रदेशच्या जनतेच्या भल्याचा काडीमात्र संबंध नाही हे तेथील जनता जाणते. कमलनाथ यांच्या राजकारणाबद्दल राज्यातील मतदारांमध्ये संभ्रम आहे. शेजारील छत्तीसगडमध्ये सत्ता राखण्यात काँग्रेसलाच यश येईल असे काही माध्यमांचे सर्व्हे सांगत असले तरी या वेळी तेथील विद्यमान मुख्यमंत्री भूपेश बघेल यांची डाळ शिजणार नाही असे भाकित अमित शाह यांनी केले आहे. बघेल यांची कारकीर्द सध्या वादात सापडली आहे. क्रिकेटमधील मॅच फिक्सिंग प्रकरणात महादेव ॲपचे नाव मध्यंतरी आले होते. या ॲपला मोकळे रान दिल्याच्या संशयाची सुई बघेल यांच्यावर स्थिरावल्याचे दिसते. राजस्थानात या वेळी भाजपलाच संधी मिळेल असे चित्र आहे. तेथील मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यातील वाद बहुचर्चित आहेत. या पार्श्वभूमीवर निकाल काय लागेल हे मतदानाचे आकडे यथावकाश सांगतीलच.**

# रायगड जिल्ह्यात विविधरंगी भात लागवड व्हायला हवी!



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात भातशेतीचे क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. असे असले तरी उत्पादकतेत वाढ होतेय ही एक समाधानाची बाब आहे. यंदाच्या खरीप हंगामात भातशेतीस अनुकूल वातवारण राहिल्यामुळे भाताच्या उत्पादकतेत वाढ झाली आहे.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात ९८ हजार ३६ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात प्रतिहेक्टरी ४० क्विंटल एवढी उत्पादकता आहे. गेल्या वर्षी प्रतिहेक्टरी ३६ क्विंटल एवढी उत्पादकता होती. यंदा ३६ लाख क्विंटल भाताचे उत्पादन होईल, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. शेतीसाठी माणस मिळत नसल्यामुळे शेती केली जात नाही. हजारो हेक्टर जमीन ओस पडलेली असते. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आता शेतीत आधुनिक तंत्रज्ञाचा वापर केला पाहिजे. त्याचबरोबर कमी क्षेत्रात जास्त उत्पादन देणाऱ्या भाताच्या वाणांची लागवड केली पाहिजे तसेच विविधरंगी भात लागवडीचे प्रयोग केले पाहिजेत. विविधरंगी भात लागवडीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचा चांगला पर्याय आहे.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात ९८ हजार ३६ हेक्टर क्षेत्रावर भात लागवडीचे नियोजन करण्यात आले होते. जून महिन्यात पाऊस उशिरा सुरू झाला. त्यामुळे शेतीच्या कामांनादेखील उशिरा सुरुवात झाली. जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे रोपे कुजली. लावणीसाठी रोपे कमी पडली. त्यामुळे ८९ हजार ६०० हेक्टर क्षेत्रावरच भात लागवड करण्यात आली. ऑगस्ट महिन्यात पावसाने दडी मारली होती. त्यामुळे भात रोपे करपून नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात होती, परंतु सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस पडला. या पावसाने भातशेतीला संजीवनी दिली.

अधिकाधिक उत्पन्न देणाऱ्या भाताच्या नव्या वाणांची लागवड, २१ दिवसांच्या रोपांचा लागवडीसाठी वापर, लावणीसाठी यांत्रिकीकरण एसआरटी व चारसुत्री पद्धत वापरण्यात आली. कर्जत, मुरूड, तळा या तालुक्यांमध्ये किरकोळ प्रमाणात भातशेतीवर खोडकिड्याचा प्रादुर्भाव झाला होता, पेण व पोलादपूर तालुक्यांमध्ये कडाकरपा रोगाचा प्रादुर्भाव झाला होता, परंतु मोठ्या प्रमाणावर कुठेही कीडरोगाचा प्रादुर्भाव झाला नाही. परतीच्या पावसाने धोका दिला नाही. भातशेतीस अनुकूल वातावरण होते. त्यामुळे उत्पादकतेत वाढ झाली आहे. त्यामुळे कमी क्षेत्रात लागवड होऊनदेखील मागील वर्षापेक्षा यंदा भाताच्या उत्पादकतेत वाढ झाली आहे.

जिल्ह्यात बहुतांश शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. उत्पन्नपेक्षा खर्च जास्त होतो. त्यामुळे शेती परवडत नाही. कोकणात शेती हा आतबट्ट्याचा व्यवहार ठरत असल्याची ओरड नेहमी होते, पण पारंपरिक पिकाला फाटा देऊन विकतं ते पिकवलं, तर शेतीतून चांगले उत्पन्न मिळू शकते हे शेतकऱ्यांनी लक्षात घेतल पाहिजे.


जिल्ह्यात भात हे प्रमुख पीक आहे. दरवर्षी खरीपात एक लाख हेक्टरवर भात पिकाची लागवड केली जाते. शेतमजुरी आणि लागवड खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही लागत नाही. त्यामुळे दरवर्षी भातलागवडीखालील क्षेत्रात घट होत असल्याचे दिसून येत आहे. तरुण पिढी शेतीपासून दुरावत चालली आहे. शेती केली तर शेतात काम करायला माणसे मिळत नाहीत. माणसे मिळाली तर त्यांचा खर्च परवडत नाही. शेती परवडत नसल्यामुळे शेती करण्यापेक्षा जमिनी विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे, मात्र योग्य नियोजन केले तर शेती फायदेशीर ठरू शकते. त्यासाठी योग्यवेळी योग्य पिकाची लागवड करणे आवश्यक आहे.

कोकणातील शेतीत पैसा मिळत नाही असे अजिबात नाही, पण त्यासाठी मेहनत घ्यावी लागते. बाजारातील मागणी लक्षात घेऊन पिकांची लागवड करावी लागते. जे विकते ते पिकवले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला चांगला दरही मिळतो. पांढरा कांदा, फुलशेती आणि तोंडली लागवडीतून चांगले उत्पन्न मिळते हे काही शेतकऱ्यांनी सिध्द केले आहे.

जिल्ह्यात पारंपरिक भाताबरोबरच विधिधरंगी भातपीक लागवड केली पाहिजे. खुल्या बाजारात विधिधरंगी भाताला चांगली किंमत मिळते. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते. लाल, काळ्या आणि जांभळ्या रंगाच्या भात पिकाची लागवड करायला हवी. खुल्या बाजारात या प्रकारच्या भातांना मोठी मागणी आहे. त्यास चांगला दरही मिळत आहे. ही बाब लक्षात घेऊन यंदा कृषी विभाग विधिधरंगी भात लागवडीचे प्रयोग करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देते. शेतकऱ्यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे. लाल, काळ्या आणि जांभळ्या रंगाच्या या भातात प्रथिने आणि कर्बोदकांचे प्रमाण सामान्य भाताच्या तुलनेत अधिक असते. हा भात मधुमेह आणि इतर आजारातील रुग्णांसाठी उपयुक्त असल्याचे जाणकार सांगतात. त्यामुळे अलिकडच्या काळात या प्रकारच्या भाताला मागणी वाढली आहे.

काळ्या भाताची लागवड करुन त्यानंतर स्वतः प्रोसेसिंग करुन तांदुळ विकल्यास दीडशे रुपयेपर्यंत दर मिळू शकतो. म्हणूनच उत्पादन खर्च, बाजारभाव व नफा याची सांगड घालायची असेल, तर पारंपरिक भाताबरोबरच विविधरंगी भाताचीदेखील लागवड केली पाहिजे.

# हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे



बाळ केशव ठाकरे ऊर्फ बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्रातील शिवसेना पक्षाचे संस्थापक, राजकारणी व व्यंगचित्रकार होते. सामना या मराठी दैनिकाचे हे संस्थापक तसेच प्रमुख संपादकही होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

बाळासाहेब ठाकरेंनी सर्वप्रथम एक व्यंगचित्रकार म्हणून सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५०मध्ये ते 'फ्री प्रेस जर्नल'मध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. पुढील काळात त्यांनी ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांच्यासमवेतही काही काळ काम केले. फ्री प्रेस जर्नलमध्ये काम करीत असतानाच ठाकरे विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी चित्रे, व्यंगचित्रे, जाहिरातीचे डिझाइन या क्षेत्रांतही काम करीत असत.

बाळासाहेबांनी नोकरी सोडून स्वतःचे साप्ताहिक (व्यंगचित्रात्मक) काढण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार त्यांनी ऑगस्ट १९६०मध्ये 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. साप्ताहिकासाठीचे हे 'मार्मिक' नाव बाळासाहेबांना वडील प्रबोधनकारांनी सुचविले होते. पुढे बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली.

वक्तृत्वाबरोबरच ठाकरे भेदक लेखनदेखील करत. प्रबोधनकार ठाकरे व प्रल्हाद केशव अत्रे यांचा प्रभाव त्यांच्या लेखनात जाणवतो. शिवाय व्यंगचित्रकाराची वेधक-वेचक निरीक्षणदृष्टीही त्यांच्यामध्ये होती.

झुणका भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टीवासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे मुंबई नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही ठाकरेंची होती. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी मुंबईत त्यांचे निधन झाले.

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप : व्हॉईस कॉलमुळे ग्रुप मेंबर्सना होणार नाही त्रास



व्हॉट्सॲपचं हे नवीन व्हॉईस चॅट फीचर आहे. हे व्हॉईस कॉल फीचर मोठ्या ग्रुपसाठी डिझाइन केलं गेलं आहे, जे लोकांना डिस्टर्ब होण्यापासून रोखेल.

व्हॉट्सॲप मध्ये एक नवीन फीचर येणार आहे, ज्याच्या मदतीने युजर्सचा चॅटिंगचा अनुभव बदलेल. या लेटेस्ट अपडेटचा उद्देश युजर्सची प्रायव्हसी अधिक चांगलं करणं हा आहे. हे फीचर अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही युजर्ससाठी उपलब्ध असेल. व्हॉट्सॲप आपल्या युजर्ससाठी नवनवीन फीचर्स आणत असतं.

व्हॉट्सॲपचं हे नवीन व्हॉईस चॅट फीचर आहे. हे व्हॉईस कॉल फीचर मोठ्या ग्रुपसाठी डिझाइन केलं गेलं आहे, जे लोकांना डिस्टर्ब होण्यापासून रोखेल. हे फीचर बीटा व्हर्जनमध्ये आधीच दिसलं आहे आणि आता या फीचरला ऑफिशियली कन्फर्म करण्यात आलं आहे. लवकरच त्याचे अपडेट सर्वांपर्यंत पोहोचेल.

व्हॉट्सॲपचे हे फीचर थोडे वेगळ्या पद्धतीने काम करेल. वास्तविक, या लेटेस्ट अपडेटमध्ये, मोठ्या ग्रुपमधील ३२ सहभागींसह ग्रुपची व्यवस्था केली जाऊ शकते. ग्रुप कॉलमध्ये प्रत्येकाला रिंग करण्याऐवजी काही लोकांना पूश नोटिफिकेशन मिळेल.

एकदा कॉलमध्ये सामील झाल्यानंतर, युजर्सना टॉपमध्ये कॉल कंट्रोल्स मिळेल. या कॉल्स दरम्यान, यामध्ये टेक्स्ट मेसेज, फोटो सेंड करता येतील. पर्सनल चॅटिंग करता येईल. हे व्हॉईस चॅट एंड-टू-एंड एन्क्रिप्टेड फॉरमॅटमध्ये असेल, जे सुरक्षिततेच्या दृष्टीने एक खास फीचर आहे.

व्हॉट्सॲपच्या या अपकमिंग फीचर अपडेट iOS आणि अँन्ड्रॉईड या दोन्ही प्लॅटफॉर्मच्या युजर्ससाठी उपलब्ध असेल. हे फीचर केवळ त्या गटांमध्ये कार्य करेल, ज्यामध्ये ३३ ते १२८ सहभागी असतील. भारतासह जगभरात व्हॉट्सॲपचे अब्जावधी युजर्स आहेत. तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत लोक या ॲपचा वापर करतात. या ॲपद्वारे ते मित्र आणि नातेवाईक यांच्याशी कनेक्ट राहतात.

# स्वातंत्र्यसैनिक लाला लजपतराय



**निमित्त**

लाला लजपतराय हे पंजाबी, भारतीय राजकारणी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी योगदान दिले. ते जहाल मतवादी नेते होते. त्यांना पंजाब केसरी असे म्हणतात. त्यांनी पंजाब नॅशनल बँकेची स्थापना केली. लाला लजपतराय यांचा आज स्मृतीदिन आहे.

लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ रोजी झाला. त्यांचे वडील मुन्शी राधाकृष्ण अग्रवाल सरकारी शाळेत उर्दू आणि पर्शियनचे शिक्षक होते. त्यांच्या आईचे नाव गुलाबदेवी अग्रवाल होते. १८४९मध्ये लाला लजपतरायांचा विवाह राधादेवींशी झाला. १८७०च्या दशकाच्या उत्तरार्धात त्यांच्या वडलांची बदली रेवरी येथे झाली. तेथील सरकारी उच्च माध्यमिक शाळेत लजपतरायांचे सुरुवातीचे शिक्षण झाले.

सुरुवातीच्या आयुष्यात लजपतराय यांचे उदारमतवादी विचार आणि हिंदुत्वावरील त्यांचा विश्वास त्यांचे वडील आणि अतिशय धार्मिक आई यांच्यामुळे तयार झाला. १८८० मध्ये, लजपतरायांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी लाहोर येथील सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. येथेच ते देशभक्त आणि भविष्यातील स्वातंत्र्यसैनिक लाला हंसराज आणि पंडित गुरुदत्त यांच्या संपर्कात आले.लाहोरमध्ये शिकत असताना स्वामी दयानंद सरस्वतींच्या हिंदू सुधारणा चळवळीचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि ते आर्यसमाजाचे सदस्य बनले. तसेच लाहोर स्थित आर्य गॅझेटचे संस्थापक, संपादक बनले.

हिंदुत्वावरील वाढत्या विश्वासामुळे ते हिंदू महासभेत सामील झाले. त्यामुळे त्यांना नौजवान भारत सभेच्या टीकेला सामोरे जावे लागले. कारण ही महासभा धर्मनिरपेक्ष नव्हती. भारतीय उपखंडातील हिंदू जीवनपद्धतीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे पुढे भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या यशस्वी आंदोलनासाठी त्यांनी शांततामय मार्गाने चळवळी केल्या.१८८४मध्ये त्यांच्या वडलांची बदली रोहतक येथे झाली आणि लाहोर येथील अभ्यास संपवून लजपतरायसुद्धा त्यांच्या बरोबर आले. १८८६मध्ये ते वडिलांच्या बदलीबरोबर हिसारला आले आणि तेथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. बाबू चूडामणींसह लजपतराय हिसारच्या बार कौन्सिलचे संस्थापक सदस्य बनले.

लहानपणापासूनच देशसेवा करण्याची राय यांची तीव्र इच्छा होती. त्यामुळे देशाची पारतंत्र्यातून सुटका करण्याची लजपतरायांनी शपथ घेतली. त्याच वर्षी त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची हिसार जिल्हा शाखा स्थापन केली. तसेच बाबू चूडामणी, चंदूलाल तयाल, हरीलाल तयाल आणि बालमुकुंद तयाल हे तयाल बंधू, डॉ. रामजीलाल हुडा, डॉ.धनीराम, आर्यसमाजी पंडित मुरारीलाल, शेठ छाजूराम जाट आणि देवराज संधीर यांच्याबरोबर लाला लजपतरायांनी आर्य समाजाची स्थापनासुद्धा केली. काँग्रेसच्या अलाहाबाद येथील वार्षिक अधिवेशनात हिसार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची १८८८ आणि १८८९मध्ये निवड झाली. १८९२मध्ये उच्च न्यायालयात वकिली करण्यासाठी ते लाहोर येथे गेले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी भारताच्या राजकीय धोरणाला आकार देण्यासाठी ते पत्रकारिता सुद्धा करत. त्यांनी द ट्रिब्यून सहित अनेक वृत्तपत्रांमध्ये नियमितपणे लेखन केले.

१८८६मध्ये त्यांनी महात्मा हंसराज यांना लाहोरमध्ये दयानंद अंग्लो-वैदिक स्कूलची स्थापना करण्यास मदत केली. भारताच्या १९४७ साली झालेल्या फाळणीनंतर लाहोरमधील या विद्यालयाचे रूपांतर इस्लामिया कॉलेजमध्ये झाले.

१९१४मध्ये स्वातंत्र्यलढ्यात योगदान देण्यासाठी लजपतरायांनी वकिलीला रामराम ठोकला. १९१४मध्ये ते ब्रिटनला गेले आणि नंतर १९१७मध्ये अमेरिकेला गेले. ऑक्टोबर १९१७मध्ये त्यांनी न्यू यॉर्कमध्ये भारतीय होमरूल लीगची स्थापना केली. १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : विकीपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : तन्वी पवार)



**पनवेल : दिवाळीनिमित्त माकेट यार्ड परिसरात असणाऱ्या एएमएस सोसायटीमधील बच्चेकंपनीने कर्नाळा किल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे.**

## आरोग्य प्रहर

# जांभळाची कोवळी पाने खाणे आरोग्यास फायदेशीर



जांभळाची कोवळी पाने खाल्ल्याने शरीराला जे चमत्कारिक फायदे झाले ते लाखो रुपयांची औषधें पण करू नाहीत असे जबरदस्त फायदे ..!! जांभूळ खाणे प्रत्येकालाच आवडते आणि त्याचे औषधी गुणधर्म बघितले तर ते आवश्यक खाल्ले पाहिजे. असे ही बहुपयोगी जांभूळ फळ असल्याने वर्षातून एकदाच उपलब्ध होते, पण तुम्हाला माहीत आहे का कि, जांभळाचे संपूर्ण झाडच औषधी गुणांनी परिपूर्ण आहे जांभळाच्या झाडाच्या पानाचे सालीचे मुळाचे औषधी उपयोग तुम्ही जाणून घेतले तर तुम्ही थक्क व्हाल. त्यामुळे वनस्पती संपूर्ण भारतभर सर्वत्र उपलब्ध आहे चला तर आपण जाणून घेऊया या. जांभळाच्या झाडाचे काही औषधी उपयोग.

काही महिलांचा वारंवार गर्भपात होत असतो अशा वेळी जांभळाच्या कोवळ्या पानांचा रस प्यायला दिल्यास गर्भपात होण्याचे रोखले जाते आणि मित्रांनो, शरीरातील उष्णता वाढून तोंडात फोड येतात, ज्यांना तोंड येणे असे म्हणतो अशा वेळेस झाडाच्या पानांचा काढा करून हे पाणी थंड झाल्यावर या पाण्याने गुळण्या केल्याने तोंडातील उष्णतेचे फोड जातात. हा उपाय दिवसातून तीन वेळा केल्याने तोंडातील फोड नष्ट होतात.

अनेक वेळा अतिथंड किंवा अति गरम पदार्थ खाल्ल्याने किंवा व्हायरल इन्फेक्शनमुळे घसा बसतो अशावेळी जांभळाच्या झाडाची ताजी साल काढून त्याच्या काढा बनवावा व या कोमट पाण्याने रात्री झोपण्यापूर्वी गुळण्या केल्याने अगदी दुसऱ्या दिवशी आराम मिळतो आणि कोणत्याही कारणाने झालेली जखम धुण्यासाठी या जांभळाच्या झाडाची पाने उकळून थंड केलेले पाणी वापरले तर त्यामुळे जखम लवकर भरण्यासाठी मदत होते. जांभळाच्या सीजनमध्ये जांभळे गोळा करून ती स्वच्छ धुऊन एका भांड्यात ठेवावीत. त्यामध्ये थोडे मीठ घालून जांभळे बुडतील एवढे पाणी टाकावे.

जांभळाच्या पानांचे सेवन मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. जांभळाच्या पानांमध्ये अँटी-हायपरग्लायसेमिक गुणधर्म आढळतात, जे रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करतात. जे मधुमेह नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

**-प्रमोद पाठक**

# मराठा आरक्षणावर लवकरच तोडगा आमदार महेंद्र दळवी



**पाली : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रात रान उठले आहे, मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यावर नक्कीच योग्य तोडगा काढून मराठा व इतर समाजाला न्याय मिळेल, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला आहे.

अलिबाग–मुरूड मतदारसंघाचे शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी मराठा आरक्षणप्रश्नी आपली भूमिका मांडली आहे. ते म्हणाले की, विजय वडेट्टीवार विरोधी पक्षनेते असल्याने सत्ताधारी पक्षावर टीका करणे त्यांचं कामच आहे. त्यातूनच त्यांना सहानुभूती मिळते, पण जी परिस्थिती उद्भवते त्या परिस्थितीला मुख्यमंत्री सामोरे जातात. मनोज जरांगे पाटील यांचा प्रश्न असो अथवा इतर विरोधी पक्षाचे इतर प्रश्नांना उत्तर देऊन काम स्वरूपात लोकांपर्यंत पोहचतात, मुख्यमंत्री शिंदे यांचे काम दिशा देणारे असेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

विरोधी पक्षाकडून आरोप करणे हे स्वाभाविकच आहे. सरकारचे काम सर्वसामान्यांपर्यंत पोहविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राज्य आणि केंद्र सरकारच्या सर्व योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यावर भर दिला जातोय, असे शेवटी आमदार दळवी म्हणाले.

## जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांच्या कारला अपघात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्या कारला अपघात घडल्याची घटना घडली आहे.

पेणकडून अलिबागकडे येत असताना गुरुवारी (दि.१६) कालखिंडीत हा अपघात घडला. या अपघातात एकजण जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून जखमींना जवळच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी पुनिता गुरव दिवाळीच्या सुट्टीनंतर गुरुवारी सकाळी नियमित कामावर निघाल्या. त्या कारमधून प्रवास करीत असताना कार्लेखिंड येथील पात्रुदेवी मंदिराजवळ आल्या असता वळणावर अचानक कारचा टायर फुटला. त्यामुळे चालकाचा ताबा सुटल्याने गाडी रस्त्याच्या कठड्याला आदळली व अपघात झाला. या अपघातात चालकाला दुखापत झाली आहे.



## मुरुडमध्ये आज उपसरपंचांची निवड

**मुरूड** : तालुक्यातील १५ ग्रामपंचायतींमध्ये शुक्रवारी (दि. १७) थेट सरपंचांना पदभार देणे व उपसरपंच निवडले जाणार आहेत. काही ग्रामपंचायतींमध्ये सदस्यसंख्या कमी असल्याने उपसरपंच विरोधी गटालासुद्धा दिले जाणार आहे.

उपसरपंचपद मिळवण्यासाठी सदस्य आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी अज्ञात ठिकाणी वास्तव्य करून रहात आहेत. असे सदस्य निवडणुकीच्या अर्धा तास अगोदर सभागृहात पोहचणार आहेत. थेट सरपंचांच्या शेजारीच उपसरपंच यांची आसनव्यवस्था असते.त्यामुळे या पदाला खूप महत्व प्राप्त झाले आहे. आर्थिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये चढाओढ असणार आहे.

## भारताच्या विजयानंतर रोह्यात भाजप कार्यकर्त्यांनी केला जल्लोष

**धाटाव : प्रतिनिधी**

ऐन दिवाळी सणात विशेषकरून भाऊबीज दिवशी क्रिकेट विश्वचषकात भारताने सेमीफायनलमध्ये दमदार कामगिरी केली. न्यूझिलंड संघाला तब्बल ७० धावांनी धूळ चारुन फायनलमध्ये दिमाखात प्रवेश केला आहे. या विजयानंतर रोह्यातील भाजप कार्यकर्त्यांनी क्रीडा रसिकांना रोहा शहर व ग्रामीण भागात गोड मिठाई देऊन भारताचा झेंडा हातात घेऊन आनंद साजरा करण्यात आला.

भारतासाठी हा विश्वचषक खास आहे. आतापर्यंत पाकिस्तानसह सर्व विरोधी संघांना भारताने धूळ चारली आहे. विशेषतः बुधवारच्या सामन्यात शतककिंग विराटचे ५०वे शतक वानखेडे मैदानावर झळकावले याचा अभिमान वाटतोय, तसेच संघातील सर्व खेळाडू जबरदस्त फॉर्ममध्ये असल्याने हा विश्वचषक भारत नक्की जिंकेल, असा विश्वास रोशन चाफेकर यांनी व्यक्त केला. या वेळी युवा कार्यकर्ते रोशन चाफेकर, हाजी कोठारी, अनिल घरजाळे, परेश चितळकर, राकेश चाफेकर, रोहित रोठे उपस्थित होते.




**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/झेरॉक्स मशीन प्रती व इतर/झेरॉक्स निविदा/२०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :–** रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **झेरॉक्स मशीन/झेरॉक्स प्रती व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. १५ लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ४,८००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ८०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. ४५,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २२/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/व्हिडीओ व फोटोग्राफी निविदा/ २०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :–** रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **व्हिडीओ छायाचित्रीकरण व फोटोग्राफी व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ४ कोटी |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ६४,०००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. ६,४०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १२,००,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २१/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/ पोस्टर,बॅनर व इतर अनुषंगिक साहित्य निविदा/ २०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**पोस्टर, बॅनर, स्टिकर,प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक बाबी पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **पोस्टर, बॅनर, स्टिकर,प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :–** रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **पोस्टर, बॅनर, स्टिकर,प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ७० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. १६,०००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू. १,६०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. २,१०,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २१/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/हमाल/मजुर पुरवठा निविदा/ २०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**हमाल/मजूर पुरवठा ई-निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**हमाल/मजूर/ पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **हमाल/मजूर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :–** रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **हमाल/मजूर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ६० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. १६,०००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू.१,६०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू.१,८०,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २२/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/ सी.सी.टी.व्हि. निविदा/ २०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**सी.सी.टी.व्हि व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **सी.सी.टी.व्हि व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव :–** रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **सी.सी.टी.व्हि व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. १ कोटी ३० लक्ष |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ३२,०००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू.३,२०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू.३,९०,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि.१३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि.२८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २१/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

---

**महाराष्ट्र शासन**

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

**दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१** **फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८**
ई–मेल :– collector.raigad@maharashtra.gov.in **ई-मेल :-** dydeoraigad@gmail.com

**क्र/निवडणूक /कार्या ६(२)/ विद्युत जोडणी साहित्य निविदा/ २०२३ दि. १०/११/२०२३**

**लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४**
**ई निविदा सुचना क्रमांक ०१/२०२३**
**विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर साहित्य पुरवठा बाबत ई निविदा सुचना**

आगामी **लोकसभा/विधानसभा** सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी **विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा** करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई–निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

कामाचे नाव :– रायगड जिल्ह्यातील लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान **विद्युत जोडणी, ध्वनीक्षेपक यंत्रणा व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा करणेबाबत.**

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. २ कोटी |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ३२,०००/– (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू.३,२०,०००/– |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू.६,००,०००/– |
| ई– निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि. १३/११/२०२३ सकाळी १०.०० वाजता |
| ई–निविदा भरण्याचा कालावधी | दि.१३/११/२०२३ सकाळी १०.०० पासून ते<br>दि.२८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि. २१/११/२०२३ सकाळी ११.०० वाजता |
| ई–निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २८/११/२०२३ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई–निविदा फार्म क्रमांक–१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ३०/११/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई–निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड–अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDFमध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई–निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पूर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

**सही/–**
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

## निवडक



### अडकलेल्या बगळ्याची सुटका

**नवी मुंबई** : सीबीडी बेलापूर से. ८ येथे धबधब्याच्या कडेला तोंडात मासे पकडण्याचा गाळ अडकलेल्या बगळ्याची सुटका पुनर्वसु फाउंडेशनच्या पक्षीमित्रांनी केली. त्याच्यावर प्राथमिक उपचार करून त्यास सुरक्षितरित्या निसर्गाच्या अधिवासात सोडून देण्यात आले. पुनर्वसु फाउंडेशनचे प्रितम भुसाणे व माधव गायकवाड यांना बगळ्याच्या तोंडात आतपर्यंत गळ अडकल्याचे दिसले. प्रितम आणि माधव यांनी बगळ्याला एका शांत ठिकाणी ठेवून त्याचा गळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यात त्यांना यश आले. त्या रातबगळ्याला पुन्हा निसर्गाच्या सान्निध्यात सोडून दिले.

### खांदेश्वर स्टेशन परिसरात मृतदेह

**पनवेल** : पनवेल रेल्वेस्टेशन ते खांदेश्वर रेल्वेस्टेशनदरम्यान एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. या मृत व्यक्तीचे वय ४५ वर्षे अंदाजे, उंची पाच फूट पाच इंच, अंगाने मजबूत, अंगात काळे व ब्राऊन रंगाचा टी शर्ट, काळ्या रंगाची फुल पॅन्ट, कमरेस काळा करगोटा आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा पोलीस पोलीस उपनिरीक्षक एम. डी. गवळी यांच्याशी संपर्क साधावा.

### अपूर्वा नेमळेकर येणार पनवेलकरांच्या भेटीला

**पनवेल** : रात्रीस खेळ चाले या मालिकेत शेवंताची भूमिका करणाऱ्या अपूर्वा नेमळेकर या शनिवारी (दि. १८) संध्याकाळी ७.३० वाजता ओरायन मॉल येथे पनवेलकरांच्या भेटीला येऊन त्यांच्यासोबत गप्पा मारणार आहेत. पनवेलमधील सुप्रसिद्ध अश्या ओरायन मॉल हे त्यांच्या ग्राहकांसाठी दरवर्षी काही ना काही नवीन उपक्रम घेऊन येतच असतात. यावर्षी विक्रम लँडर हुबेहुब येथे साकारण्यात आले आहे, तर ते बघण्यासारखा नक्कीच आहे, परंतु शॉप अँड विन कॉन्टेस्ट होणार आहे आणि त्याचा लकी ड्रॉ पण काढण्यासाठी व विजेत्यांना बक्षीसे देण्यासाठी अपूर्वा नेमळेकर येणार असल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर व मनन परुळेकर यांनी दिली.



**पनवेल : शहरातील कट्टा परिवारातर्फे साकारण्यात आलेल्या तोरणा गडाला भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भेट देऊन उभारलेल्या किल्ल्याचे कौतुक केले. कट्टा परिवाराच्या वतीने पत्रकार संजय कदम यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी अनिमेष पटवर्धन, सौरभ रामधरणे, अमेय भातखंडे, सागर जोग, प्रभंजन गाडगीळ, निखिल खोंड, अनिमेष ओझे, तन्मय समेळ, सुरभी खरे, कोमल कोळी, ऋचा कदम, ऐश्वर्या शेडगे, मेघना कदम आदी उपस्थित होते.**

# दिघावासीयांची पाण्याची समस्या मिटणार!

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा परिसरातील नागरिकांना एमआयडीसीच्या बारवी धरणाचे पाणी मिळत आहे. एमआयडीसीने शटडाऊन घेतल्यास किंवा जलवाहिनी फुटण्याच्या घटना घडल्यास दिघावांसीयांना पाण्यासाठी दाहीदिशा वणवण भटकंती करावी लागते. आता एमआयडीसीकडून पालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या ओसएन वन भूखंडावर भूमिगत व उच्चस्तरीय पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरू असून पाण्याची टाकी दृष्टीक्षेपात आहे. त्यामुळे दिघावासीयांच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

पाण्याच्या टाकीचे काम जवळपास ५० टक्के पूर्ण झाले असून नूतन वर्षापर्यंत टाकीतून पाणीपुरवठा सुरू होईल, असा विश्वास अभियंता यांनी व्यक्त केला आहे. जवळपास १२ कोटी रुपये खर्च करून पाण्याची टाकी बांधण्यात येत आहे. त्यातच मोरबे धरणाची जलवाहिनीदेखील दिघापर्यंत येणार असून त्याचेदेखील पाणी सुरू झाल्यांनतर दिघातील

## भूमिगत टाकीचे काम सुरू

रहिवाशांची पाण्यासाठी होणार वणवण थांबणार आहे.

नवी मुंबई नगरपालिका क्षेत्रातील दिघा परिसरामध्ये एमआयडीसीच्या बारावी धरणांचे पाणी मिळते. पालिकेच्या स्वतांच्या मालकीच्या असणाऱ्या मोरबे धरणाचे पाणी आजतागायत मिळाले नाही. दिघा येथील लोकप्रतिनिधींनी पालिकेच्या सभागृहात वारंवार आवाज उठवल्यांनतर पालिकेने मोरबे धरणाची जलवाहिनी दिघापर्यंत टाकण्याचे काम केले आहे, पण दिघा येथील नागरिकांसाठी पाण्याची साठवणूक करण्यासाठी पाण्याची टाकीच उपलब्ध नसल्यामुळे दिघांवासीयांचे पाण्यावाचून हाल होत होते.

यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पाण्याची टाकी बांधण्यसाठी मागणी केली होती. त्यानुसार पालिकेने पाण्याची टाकी मंजूर केली.

**पाण्याची टाकी व्हावी यासाठी आवाज उठवला. त्यांनतर पालिकेकडून दिघासाठी पाण्याची टाकी उभारण्याचे काम सुरू केले असून पाण्याची टाकी दृष्टीक्षेपात आली आहे. टाकीचे काम पूर्ण झाल्यांनतर दिघावासीयांची पाण्याची चिंता मिटणार आहे.**
**–नवीन गवते, माजी स्थायी समिती सभापती, नपुंमपा**

## सिडकोच्या घरांच्या किमती कमी होण्याची शक्यता

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान आवास योजेनेतील घरांच्या किंमती कमी करण्यासंदर्भात सिडकोकडून मुख्यमंत्री कार्यालयाकडे प्रस्ताव देण्यात आला आहे. या प्रस्तावामुळे बामणडोंगरी, खारकोपर येथील आवास योजनेतील घरांच्या किमतीत घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आवास योजनेतून घर घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी राज्य सरकार मोठा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

दरम्यान, ग्राहकवर्गाचे लक्ष राज्य शासनाच्या निर्णयाकडे लागले असून यामुळे आवास योजनेतून स्वस्तात घर खरेदी करण्याचे सर्वसामान्य नागरिकांचे स्वप्न साकार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, तर दिवाळीच्यानिमित्ताने सिडकोच्या माध्यमातून आवास योजनेंतर्गतल्या घरांची किमती कमी होणार आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत खारकोपर आणि बामणडोंगरीमध्ये सात हजार ८४९ घरांची योजना जाहीर करण्यात आली आहे, तसेच या घरांच्या किमती चार ते पाच लाखांनी कमी करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे.

## ३०० रुपयांची लिपस्टिक पडली एक लाखाला

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीत राहणाऱ्या एका महिला डॉक्टरला ऑनलाईन लिपस्टिक मागवणे चांगलेच महागात पडले आहे. या महिला डॉक्टरला सायबरचोराने लिपस्टिकचे पार्सल पाठविण्याच्या बहाण्याने तिच्या मोबाईलवर लिंक पाठवून त्यात तिला संपूर्ण माहिती भरण्यास भाग पाडले. त्यानंतर सायबरचोराने या डॉक्टरच्या मोबाईलवर ताबा मिळवून तिच्या खात्यातून एक लाख रुपये परस्पर दुसऱ्या खात्यात वळते करून घेतले. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबरचोराविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली ३१ वर्षीय महिला डॉक्टर कळंबोलीतील रोडपाली येथे राहण्यास असून ती त्याच भागातील एका खासगी रुग्णालयात कामाला आहे. या महिला डॉक्टरने

**महिलेची फसवणूक; गुन्हा दाखल**

ऑनलाईन लिपस्टिक ऑर्डर केली होती. त्यानंतर चार दिवसांनंतर या डॉक्टरचे लिपस्टिकचे पार्सल डिलिव्हर झाल्याचा तिला मेसेज आला होता, परंतु तिला पार्सल न मिळाल्याने तिने ब्ल्यू डार्ट या पार्सल एजन्सीला संपर्क साधून पार्सलबाबत चौकशी केली होती.

त्यानंतर या डॉक्टरला सायबरचोरांनी संपर्क साधून तिचे पार्सल होल्डवर ठेवण्यात आल्याचे व ते डिलिव्हर होण्यासाठी दोन रुपये ब्ल्यू डार्टला पाठवावे लागतील असे सांगितले, मात्र या डॉक्टरने पैसे पाठविण्यास नकार दिल्याने सायबर चोराने डॉक्टराला एक लिंक पाठवून ते डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानुसार, डॉक्टरने संपूर्ण माहिती भरल्यानंतर सायबरचोराने डॉक्टरला ते ॲप अनइन्स्टॉल करण्यास सांगून पार्सल पोहचविणाऱ्या डिलिव्हरी बॉयचा नंबर दिला. त्यानंतर सायबरचोराने डॉक्टरच्या मोबाईलवर ताबा मिळवून तिच्या बँक खात्यातून प्रथम ९५ हजार व नंतर पाच हजार असे एकूण एक लाख रुपये दुसऱ्या खात्यात वळते करून घेतले.

याबाबतचे मेसेज डॉक्टरच्या मोबाईलवर आल्यानंतर फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले. त्यानंतर या डॉक्टरने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## अजिवलीत किल्ले आणि रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद





**उरण : रामप्रहर वृत्त**

सालाबादाप्रमाणे आई गावदेवी अजिवली मंडळातर्फे किल्ले आणि रांगोळी स्पर्धा मोठ्या उत्साहात झाली. किल्ले अणि रांगोळी स्पर्धा ही प्रत्येकी दोन गटात भरविण्यात आली.

४ ते १५ वर्ष किल्ले स्पर्धेत प्रथम अथर्व नितीन माळी, द्वितीय दर्शन नारायण शेलार, तृतीय संस्कृती संदीप गायकर; रांगोळी स्पर्धा : प्रथम जिया मनोज सार्डेकर, द्वितीय भावी गिरीश गायकर, तृतीय रुद्रानी रुपेश बडे; १६ वर्षांच्या पुढील किल्ले स्पर्धेत प्रथम युगांत सचिन गायकर, द्वितीय प्रणय भास्कर सार्डेकर, तृतीय देवराज संजय भागीत; रांगोळी स्पर्धेत प्रथम रश्मी लक्ष्मण शेडगे, द्वितीय सृष्टी भागीत, तृतीय क्रमांक प्रतीक्षा विष्णु माळी आणि प्रांजल पांडुरंग सार्डेकर यांनी पटकावला.

विजेत्या स्पर्धकांना आणी सहभाग घेतलेल्याला सर्वांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी नितीन माळी, सुशांत गायकर, गणेश शेडगे, गीतेश सार्डेकर, रोहित गायकर, संदेश गायकर, वैभव शेडगे, पांडुरंग सार्डेकर, जितेंद्र बडे, साहील गायकर यांनी मोलाचा हातभार लावला.

### चिमुरडीवर चुलत्याकडून लैंगिक अत्याचार

**पनवेल : वार्ताहर**

नराधम चुलत्यानेच आपल्या पाच वर्षीय भाचीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना तालुक्यातील खुटारी गाव परिसरात घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

खुटारी गाव परिसरात राहणाऱ्या फिर्यादी यांच्या पतीचा चुलत भाऊ (वय २१) याने त्यांच्या घरी येऊन तिच्या आईच्या परवानगीशिवाय मिठाई देण्याचे बहाण्याने त्यांची पाच वर्षीय मुलीस बाहेर खुटारी गाव परिसरात नेले व तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार आईने तळोजा पोलीस ठाण्यात दिली आहे.

## डॉ. आशिष जैन यांची नियुक्ती



**पनवेल : वार्ताहर**

श्री. ऋषिकेश शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर देवद पनवेलचे प्राचार्य डॉ. आशिष सुरेश जैन यांची मुंबई विद्यापीठाच्या औषध निर्माण शास्राचा अभ्यास मंडळावर विद्यापीठ प्रशासकीय व्यवस्थापनाकडे आलेल्या नामनिर्देशित तज्ज्ञांमधून सखोल निकषांच्या आधारावर नियुक्ती जाहीर केली आहे. ती पुढील पाच वर्षांसाठी आहे.

या नियुक्तीबद्दल त्यांचे स्तरावर सर्वत्र कौतुक होत आहे. चेअरमन आदर्श शैक्षणिक समूह तथा प्रदेश संयोजक भारतीय जनता पक्षाचे पदवीधर प्रकोष्ठचे धनराज विसपुते व संस्थेच्या सचिव संगीता विसपुते यांनी विशेष अभिनंदन केले आहे. ही बाब महाविद्यालयासाठी गौरव व अभिमस्पद आहे अशी भावना व्यक्त केली आणि संस्थेतील इतर विभागाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सहकारी तसेच विद्यार्थी वर्गाने अभिनंदन केले आहे.

## दुचाकींसाठी आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नवीन खासगी दुचाकी वाहनांसाठी एमएच ४६ सीपी या नवीन मालिका लवकरच सुरू होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे.

या मालिकेतील नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास तरतुदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाईल, असे सांगण्यात आले आहे.

## दीपावलीनिमित्त दिवाळे गावातील बहिरीनाथाचा उत्सव उत्साहात


**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईला आधुनिक शहराचा मान मिळालेला आला तरी अद्याप या शहरात गाव संस्कृती कायम आहे. या गावात देखील आपल्या परंपरा व संस्कृती तितक्याच आत्मियतेने जपल्या जातात. त्यातीलच एक नवी मुंबई, उरण, पनवेल भागात प्रसिद्ध असलेल्या दिवाळे गावातील बहिरीनाथाचा उत्सवदेखील प्रसिद्ध आहे. या बहिरीनाथाचे नवी मुंबईतील दिवाळे गावात आगमन झाले होते. बहिरीनाथाचे एक दिवस उशिरा आगमन झाल्याने यंदा दोन दिवस गावात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. मंगळवारी बहिरीनाथाचे पारंपरिक पद्धतीने बोटीतून नेऊन विसर्जन करण्यात आले.

नवी मुंबईला विस्तीर्ण खाडीकिनारा लाभला आहे. नवी मुंबईतील मासळी बाजारासाठी प्रसिद्ध अशी दिवाळे गावाची ओळख आहे. त्यासोबत बहिरीनाथाचा उत्सव म्हणजे आनंदाचा सोहळा समजला जातो. मुख्य म्हणजे वर्षभर समुद्रात बहिरीनाथाचे वास्तव्य असते. दिवाळीत तीन दिवसांसाठी बहिरीनाथ दिवाळे गावात मुक्कामास येतात. या उत्सवात देवाच्या दर्शनाला तसेच नवस बोलण्यासाठी नवी मुंबई, मुंबई, पनवेल, ठाणे, उरण येथून मोठ्या संख्येने भाविक हजेरी लावतात.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी देवाला सकाळी अभिषेक घालून सायंकाळी पालखीत बसवून मोठ्या धामधुमीत ग्रामप्रदक्षिणा घालण्यात येते. या वेळी गावातील भाविकांनी देवाला दिवाळीचा फराळ, मिठाई, नारळ, हार, फुले अर्पण करून रात्री देवाला मंदिरात बसवून रात्रभर जागर करण्यात येतो. दिवाळी पाडव्याच्या दिवशी पहाटे ५ वाजल्यापासून मागील वर्षीचे नवस फेडायला व नवीन नवस बोलायला भाविकांची मंदिरात अलोट गर्दी होते.

देवाला दिवाळी फराळासोबत नवस केलेल्या विविध वस्तू अर्पण केल्या जातात. त्यानंतर दुपारी १ वा. च्या सुमारास देवाला पालखीत बसवून, वाजत-गाजत बंदरातील होडीत बसवून गावकरी व भाविक निरोप देतात.



### २५० वर्षांपासूनची परंपरा

दरवर्षी तीन दिवसांच्या उत्सवानंतर बहिरीनाथाला खोल समुद्रात विधिवत सोडले जाते. दिवाळीला पुन्हा या खोल समुद्रातून बहिरीनाथाला म्हणजेच बहिरीनाथाच्या मूर्तीला शोधून आणले जाते. दिवाळे गवतीम घारापुरी बेटाजवळील समुद्रातून बहिरीदेवाची मूर्ती शोधण्यासाठी ३५ ते ४० बोटी रवाना होतात. त्यात ३००पेक्षा अधिक तरुण व ज्येष्ठ नागरिक असतात. बहिरीनाथाची मूर्ती खोल समुद्रात मागील वर्षी विसर्जन केलेली कोणतीही खूण नसताना सापडते हे आश्चर्यच म्हणावे लागेल. ही जड मूर्ती होडीने वाजत गाजत दिवाळे गावात आणली जाते. त्यानंतर गावाचा दिपावली उत्सव खऱ्या अर्थाने सुरू होतो. मुख्य म्हणजे ही २५० वर्षांहून अधिक जुनी प्रथा असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

## डॉ. बळीराम गायकवाड यांचे व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

थोर क्रांतिकारक आणि अग्रणी समाजसुधारक क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, सेक्टर १५, ऐरोली येथे शनिवारी (दि. १८) सायं. ६.३० वा. प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम नामदेवराव गायकवाड यांचे विशेष व्याख्यान 'लहुजी वस्ताद साळवे यांचे सामाजिक समतेचे स्वप्न' या विषयावर आयोजित करण्यात आलेले आहे. दांडपट्टा, तलवारबाजी, घोडेस्वारी, बंदुकबाजी, निशाणेबाजी अशा विविध युद्धकलांमध्ये निपूण असणाऱ्या लहुजी वस्ताद यांनी स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक निर्मितीचे ध्येय नजरेसमोर ठेवून मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा निश्चय केला आणि त्यासाठी ब्रह्मचारी राहण्याचे ठरविले. त्यांनी शस्त्रास्त्रांच्या गुप्त प्रशिक्षणासाठी पुणे येथे गुलटेकडी परिसरात तालीम युद्ध कलाकौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. १८५७च्या उठावात लहुजींच्या तालमीत तयार झालेले अनेक क्रांतीवीर सहभागी होते. क्रांतिकारक घडविण्यासोबतच सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठीही लहुजींनी पुढाकार घेतला. सामाजिक चळवळीत अग्रणी असलेल्या क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्यासारख्या सर्वस्पर्शी व्यक्तिमत्वाच्या मनातील सामाजिक समतेचे स्वप्न उलगडण्यासाठी डॉ. बळीराम गायकवाड हे शनिवारी उपस्थित राहणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## पनवेलमध्ये 'स्वरदीप' उजळले

**पनवेल : वार्ताहर**



अभ्यंगस्नान, फराळ, दिव्यांची रोषणाई, तसेच दिवाळीचे अविभाज्य अंग ठरलेल्या संगीत मैफिलीचे आयोजन दीपावलीच्या पूर्वसंध्येला पनवेल कल्चरल असोसिएशन आणि ज्येष्ठ नागरिक संघ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, पनवेल येथे करण्यात आले होते.

यात पं. जीतेंद्र अभिषेकी आणि पं. राजन मिश्रा यांचे शिष्य पं. मोहन दरेकर आणि अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या शिष्या दीपिका भिडे-भागवत यांनी आपल्या अनुभवसिद्ध, दमदार गायनाने रसिकांची मने जिंकली.

मैफिलीच्या सुरुवातीला दीपिका भिडे भागवत यांनी केदार रागातील, झपतालातील 'मालनीया...' ही अश्विनी भिडे-देशपांडे यांची रचना सादर केली. त्यानंतर ते दृत एकतालातील एक बंदिश आणि कुमार गंधर्व यांचे 'गुरूपैया लागो ना..' हे निर्गुणी भजन गायले. मैफलीच्या पूर्वार्धाची समाप्ती करताना त्यांनी 'पद्मनाभा नारायणा..' हे लोकप्रिय पद गाऊन रसिकांची मने जिंकली. मध्यांतरानंतर पं. मोहन दरेकर यांनी भिन्न षड्ज या रागामधील रूपक तालातील 'ऐसी भई मोरी विपत सखी.. ही बंदिश सादर केली. त्यानंतर त्रितालमध्ये 'सखी री मन मोरा..' व त्यानंतर 'याद पिया की आये..' सादर केले. पं. जितेंद्र अभिषेकी यांनी संगीतबद्ध केलेले आणि गाऊन लोकप्रिय केलेले 'काटा रूते कुणाला..' रसिकांची दाद घेऊन गेले. त्यानंतर त्यांनी 'तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल..' हा राम फाटक यांनी संगीतबद्ध केलेला लोकप्रिय अभंग सादर केला. मैफिलीची सांगता त्यांनी 'रामनाम ज्याचे मुखी..' या भैरवीने केली.

या दोन्ही गायकांना सुयोग्य अशी साथसंगत लाभली होती, हार्मोनियमवर अनंत जोशी यांची तर तबल्यावर किशोर पांडे यांची. याशिवाय पखवाजवर धनंजय खुटले व विविध तालवाद्यांवर समीर कर्वे यांची साथ लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिरुद्ध पेंडसे यांनी केले.

# पर्यटक निघाले कोकणात!

## दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे महामार्गावर वाहनांची वर्दळ वाढली

**माणगाव : प्रतिनिधी**

दिवाळीतील सुट्ट्यांमुळे पर्यटकांची पावले कोकणाकडे वळली आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांची रहदारी वाढली असून माणगाव शहरात वाहतूक कोंडी होत आहे.

शनिवार, रविवार असणारी वाहतूक कोंडी सलग सुट्या आल्यामुळे दैनंदिन झाली आहे. मुंबई, पुणे येथील पर्यटक, नागरिक दिवाळीमुळे कोकणात येऊ लागले आहेत. परिणामी वाहतूक कोंडीशी सामना करावा लागतो आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या प्रमाणात पर्यटनस्थळी तसेच गावाकडे नोकरदारवर्ग येऊ लागला आहे. यामुळे महामार्गावर माणगाव शहरात सर्व बाजूंनी तासन्तास प्रवाशांची राखडपट्टी होत आहे. माणगाव हे दक्षिण रायगडचे प्रवेशद्वार आणि मुंबई-गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असल्याने या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात सकाळपासून संध्याकाळपर्यंत वाहतुकीची कोंडी होत आहे. ही वाहतूक कोंडी माणगावकरांसह सर्वांनाच डोकेदुखी ठरत आहे.

माणगाव बाजारपेठेतील पुणे-निजामपूर-माणगाव रस्ता, मोर्बा मार्ग तसेच मुंबई-गोवा महामार्गावर प्रवासी पर्यटकांच्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. माणगाव बायपास रस्त्याचे काम थांबल्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे.




**दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक वाढली आहे. याचा परिणाम म्हणून माणगाव शहरात वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे स्थानिक प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते आहे.**

**-राहुल दसवते, स्थानिक नागरिक**

# स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा दिनानिमित्त स्पर्धा विश्व अकॅडमी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र, रायगड- अलिबाग येथे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी विधी सेवा प्राधिकरणच्या माध्यमातून आयोजित जनजागृती कार्यक्रमामध्ये विविध मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे न्यायाधीश अमोल शिंदे, नवनियुक्त कनिष्ठ न्यायाधीश ईशा घाडगे, दहशतवाद-सायबर क्राईम ब्रँचचे एपीआय सोमनाथ लांडे, अक्षय पाटील, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी, ॲड. तन्मय म्हात्रे, विधी सेवा प्राधिकरणाच्या प्रणिता मगर, स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

न्यायाधीश ईशा घाडगे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे तयारी कशी करावी याची माहिती दिली. स्पर्धा परीक्षा ही एक प्रोसेस आहे आणि या प्रोसेसमधून जाताना आपण संपूर्ण घडत असतो. अभ्यासाबरोबर आपल्या फिटनेसकडेदेखील लक्ष दिले पाहिजे. अभ्यास करताना आपण आधीचे पेपर पाहिले पाहिजेत. स्वतःवर विश्वास ठेवा, एखादे अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे, असे त्या म्हणाल्या.



दहशतवाद व सायबर क्राईम शाखेचे सोमनाथ लांडे यांनी २०२०मध्ये भारत सरकारने सुरू केलेला नशामुक्त भारत या संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली. भारतामध्ये अमली पदार्थ का व कसे येतात? आणि त्या मागचा दुष्ट हेतू काय आहे याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना अवगत केले. पिढी सक्षम करण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांवर आहे. त्यासाठी सर्वांनी काम केले पाहिजे, असे ते म्हणाले. त्याचबरोबर सायबर क्राईम म्हणजे नेटवर्क वापरून केले जाणारे गुन्हे. लोन ॲप, फेक कॉल, ऑनलाईन फ्रॉड या व अशा वेगवेगळ्या सायबर क्राईमविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच आपण या अशा प्रकारच्या आर्थिक फसवणुकीच्या विळख्यात अडकल्यास १९३० या क्रमांकावर २४ तासांच्या आत तक्रार करून फसवणुकीपासून आपला बचाव करू शकता, असे त्यांनी सांगितले.

सायबर क्राईम ब्रँचचे अक्षय पाटील यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा वापर करताना कोणती काळजी घ्यायची या संदर्भात मार्गदर्शन केले. ॲड. तन्मय म्हात्रे यांनी नार्कोटिक ड्रग्स ॲण्ड सायकोट्रॉपीक सबस्टन्स ॲक्ट १९८५संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली.

विधी सेवा प्राधिकरणाचे न्यायाधीश अमोल शिंदे यांनी विधी सेवा दिन का साजरा केला जातो याचा उलगडा करून न्यायव्यवस्था ही कायम आपल्याबरोबर असते या संदर्भात माहिती दिली. कायदेविषयक जनजागृती रायगड जिल्ह्यामध्ये केली जाते. गरजू व्यक्तींना मोफत विधी सहाय्य उपलब्ध करून दिले जाते हेही त्यांनी सांगितले.

सर्व मान्यवरांनी स्पर्धा विश्व अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तपस्वी गोंधळी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्पर्धा विश्व अकॅडमीच्या संचालिका सुचिता साळवी यांनी मानले. कार्यक्रमास जिल्ह्यातील बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेल श्रीवर्धन विधानसभा अध्यक्षपदी अल्ताफ धनसे

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलच्या श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ अध्यक्षपदी अल्ताफ धनसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार सुनील तटकरे यांनी मोर्बा येथे झालेल्या कार्यक्रमात ही नियुक्ती जाहीर केली.



अल्ताफ धनसे हे मोर्बा येथील शांत व संयमी व्यक्तिमत्व असून सामाजिक कार्यात नेहमीच हिरीरिने सहभाग घेत असतात. तरुणांचे स्फूर्तिस्थान व आशास्थान म्हणून तरुण पिढी त्यांच्याकडे पाहते. ते एक तरुण उद्योजक असून लोकांच्या सुख-दुःखात धावून जात असल्याने त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. नुकत्याच झालेल्या मोर्बा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत शेकापची सत्ता खालसा करीत धनसे यांनी राष्ट्रवादीची सत्ता आणली. त्यामुळे त्यांना नवी संधी देण्यात आली आहे.

या वेळी खासदार सुनील तटकरे यांनी, अल्ताफदादा आता आपण मोर्ब्यापुरते सीमित न राहता संपूर्ण श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाची राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक समाजाची जबाबदारी तुमच्यावर आहे, असे सूचित केले मतदारसंघातील विकासकामांबरोबरच अल्पसंख्याक समाजाच्या ज्या काही योजना असतील त्यांचा लाभ समाजातील विद्यार्थ्यांना मिळवून देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करेन. शिवाय पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवून पक्षसंघटना अधिकतम मजबूत करेन, अशी प्रतिक्रिया धनसे यांनी दिली.

# नगीना खान यांचा सत्कार सोहळा

**अलिबाग : प्रतिनिधी**



गोरक्षक व सामाजिक कार्यकर्त्या म्हणून काम करणाऱ्या नगीना अन्वर खान यांचा महाराष्ट्रातील अलिबाग, मुंबई, नाशिक, पुणे, बारामती या ठिकाणी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यातील अलिबाग येथील कार्यक्रम २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा जनशिक्षण संस्थान येथे होणार आहे.


नगीना अन्वर खान या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचाराने प्रेरित होऊन अत्यंत प्रतिकूल परिस्थित काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला या ठिकाणी गोशाळा चालवतात. ४० गायी आणि त्यांना झालेली वासरे यांची जबाबदारी नगीना खान मागील चार वर्षांपासून पार पाडत आहेत.

गोरक्षणासोबतच त्या समाजसेवा व महिला सक्षमीकरणाचेदेखील काम नगीना खान करीत आहेत. त्या करीत असलेल्या उत्कृष्ट कामाची माहिती सगळ्यांना मिळावी. त्यांच्या कामाचे श्रेय त्यांना मिळावे तसेच या कार्यात त्यांना प्रोत्साहन मिळावे व अनेक स्त्रियांना त्यांच्या कामातून प्रेरणा मिळावी म्हणून महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

# युवा संगीतकार राज धुमाळ पुरस्काराने सन्मानित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथील संगीतकार राज धुमाळ यांना आर्ट बिट्सच्या वतीने महाराष्ट्र युवा कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या हस्ते मुंबईतील दादर येथील छत्रपती शिवाजी पार्क येथे धुमाळ यांचा सन्मान झाला.



राज धुमाळ यांनी अनेक गाणी संगीतबद्ध तसेच अनेक अल्बम स्वरबद्ध केले आहेत. त्यांनी प्रसिद्ध गायक नंदेश उमप, उत्तरा केळकर व रोहित राऊत यांच्या गीतांना स्वरसाज चढवला आहे.

राज हे इलेक्ट्रिक इंजिनियर आहेत. त्यांनी नांगरवाडी या ग्रामीण ठिकाणी स्वतः संगीत कला स्टुडिओची निर्मिती करून संगीत कला जोपासली आहे. महाराष्ट्र युवा कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे अभिनंदन होत आहे. परिसरातील लोकांनी त्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वांगणीत एक दिवा शहिदांसाठी! दीपावलीत उपक्रम

## भाजप नेते एकनाथ ठाकूर यांचा पुढाकार

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणेजवळील वांगणी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच, विद्यमान सदस्य व जनहित कामगार कर्मचारी महासंघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष असलेले भाजपचे युवा नेते एकनाथ ठाकूर यांच्या पुढाकाराने संकल्प मंडळामार्फत बुधवारी (दि.१५) एक दिवा शहिदांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात वांगणी ग्रामस्थांकडून शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच संकल्प मंडळाच्या वतीने दीपावलीनिमित्त आयोजिलेल्या गडकिल्ले व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमास तंटामुक्ती कमिटीचे अध्यक्ष शंकर ठाकूर, मोरेश्वर तेलंगे, हरिश्चंद्र तेलंगे, रवींद्र ठाकूर, भाऊ तेलंगे, सुरेश तेलंगे, चंद्रकांत तेलंगे, अंकुश तेलंगे, गणपत तेलंगे, पोलीस पाटील आदिती ठाकूर, खंडू तेलंगे, सौरभ तेलंगे, पांडुरंग तेलंगे, मंदार तेलंगे, राकेश भिसे, शुभम तेलंगे, मनिष्ट तेलंगे प्रशांत ठाकूर, सदानंद चव्हाण, रोशन चव्हान, हनुमंत घायले, अर्जून ठाकूर, मोहन तेलंगे, देविदास तेलंगे, दिपेश तेलंगे, सहील तेलंगे, नरेश चव्हाण, भरत यादव, तेजेश तेलंगे, जय गोळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाऊबीजनिमित्त मटण, चिकनची खरेदी-विक्री





(छाया : इजाज मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

भाऊबीजनिमित्त भावांच्या आदरातिथ्यासाठी स्वादिष्ट, रुचकर भोजनाची सोय व्हावी या भावनेने पेणमध्ये सकाळपासून मटण आणि चिकनच्या दुकानात नागरिकांनी रांगा लावल्या होत्या, तर चांगला धंदा झाल्याने विक्रेतेही खुश झाले.

दिवाळीत भाऊबीज हा सण उत्साहात साजरा केला जातो. रक्षाबंधनाप्रमाणेच भाऊबीज हादेखील भाऊ-बहिणीचा सण आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्याची कामना करतात. ज्याप्रमाणे रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर धागा बांधतात, त्याचप्रमाणे भाऊबीजेच्या दिवशी बहिणी आपल्या भावाला ओवाळतात.

पेणमधील सकाळपासूनच शहरातील नागरिकांनी मटण, चिकन, मच्छी घेण्यासाठी गर्दी केल्याने जणू तेथे जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. वाहनांच्या गर्दीतून नागरिकांना वाट काढावी लागत होती. तरीही ते मागे हटले नाहीत.

भाऊबीजनिमित्त कुटुंबांना एकत्र येण्याची, सणासुदीचे जेवण सर्वांनी सोबत करण्याची आणि भावंडांच्या नात्यातील स्नेह, आनंद वाटून घेण्याची खास वेळ म्हणून हा सण महत्त्वाची भूमिका निभावतो. कुटुंबातील प्रेम, समजूतदारपणा आणि ऐक्याचा भाव जोपासण्यात या सणाचे सार आहे.

यंदा भाऊबीजेला बुधवार आल्याने नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दुकानावर झाली होती. यासाठी चांगल्या जातीचे, उत्तम, दर्जेदार बोकड बाजारातून खरेदी करून आणण्यात आले होते, अशी प्रतिक्रिया मटण विक्रेते सलमान कुरेशी यांनी दिली.

# लक्ष्मण सांगळे यांचा अमृत महोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्याच्या इंदापूर विभागातील रुद्रवली गावचे सुपुत्र तथा सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण सांगळे यांच्या अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन सांगळे परिवारातर्फे रुद्रवली येथे करण्यात आले होते. या सोहळ्यास खासदार सुनील तटकरे व ज्येष्ठ नेते शेखर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली. दोघांनींही सांगळे यांच्या कार्याचा गौरव केला.

या अमृत महोत्सवी सोहळ्यात सांगळे परिवारातर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी दप्तर व खाऊचे वाटप करण्यात आले तसेच १००हून अधिक जेष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व घड्याळ देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे इंदापूर विभाग अध्यक्ष काका नवगणे, भुवन ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच दीपक जाधव, इंदापूर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच उदय अधिकारी, महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्ष श्रद्धा यादव, नितीन घोणे, बाळा खातू, मेघनाथ सातपुते, गणेश पवार, धनंजय ढवळे, नथुराम पवार, सुकृदास मोरे, टेम्पोवाले, राजेंद्र नवगणे, नामदेव वातेरे, दगडू निकम, नथुराम सुर्वे, काशिराम निकम, दामाजी शिगवण, दिलीप पांगारे, कानू खामकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-23/23-24/Rfx No.7000029018 | E-tender for work of Removing & cutting grass, shrubs, trunks in ROW of 400 kV lines under 400 kV line maint s/dn under 400 KV RS (O & M) Division Nagothane...**1st Ext..** | **Rs. 3,49,054/-** | **23.11.2023 up to 23.59 Hrs** |

**EMD Rs. 5,000/-** &Tender fee Rs. 500/- + GST for further details visit our website https://srmtender.mahatransco.in/
**Contact Person:** Mitesh Goyal (DYEE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in
**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

# सामना एक, विक्रम अनेक!

## भारत-न्यूझीलंड सेमीफायनलमध्ये रेकॉर्ड्सची रांग



**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीचा सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन संघांमध्ये रंगला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताने न्यूझीलंडवर ७० धावांनी विजय मिळवला. या लढतीत अनेक विक्रम झाले आहेत.

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने ११३ चेंडूंमध्ये ११७ धावांची खेळी करीत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला आहे. वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं करण्याचा विक्रम सचिनच्या नावे होता. सचिनने वनडे सामन्यांत ४९ शतके केली होती. विराटने ५०वे शतक करीत सचिनचा रेकॉर्ड मोडला.

विश्वचषक २००३मध्ये सचिनने ६७३ धावा केल्या होत्या. विराटने सचिनचा हा रेकॉर्डही मोडला आहे. आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये विराटने ७११ धावा केल्या आहेत.

विश्वचषक स्पर्धेत भारताच्या आशिष नेहराने २३ धावा देत सहा विकेट्स काढल्या होत्या. २००३मध्ये इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात ही कामगिरी त्याने केली होती. मोहम्मद शमीने न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यात सात विकेट्स घेत नेहराला मागे टाकले. २०११मध्ये झहीर खानने विश्वचषक स्पर्धेत २१ विकेट्स घेतल्या होत्या. मोहम्मद शमीने (२३ विकेट्स) झहीरलाही मागे टाकले. यात २७ विकेट्ससह ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क अव्वल स्थानी आहे. त्याखालोखाल २६ विकेट्स घेत ग्लेन मॅग्रा, चमिंडा वास व मुथ्थया मुरलीधरन आहेत, तर शॉन टेटने २३ विकेट्स घेतल्या होत्या.

विश्वचषकात एका सामन्यात सात विकेट्स घेत शमी दिग्गजांच्या पंक्तीत जाऊन बसला आहे. याआधी ग्लेन मॅक्ग्रा, अँडी बिचेल, टीम साऊदी, विन्सटन डेव्हिस यांनी अशी कामगिरी केली आहे, तर विश्वचषकाच्या नॉकआऊट सामन्यात एका मॅचमध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा रेकॉर्ड शमीने आपल्या नावे केला आहे. ऑस्ट्रेलियाच्या गॅरी गिलमोरचा रेकॉर्ड त्याने मोडला आहे. १९७५मध्ये गॅरीने इंग्लंडविरोधात १४ धावा घेत सहा विकेट्स काढल्या होत्या.

शमीने आतापर्यंत चार वेळा पाच विकेट्स घेतल्या आहेत, तर मिचेल स्टार्कने आतापर्यंत तीन वेळा पाच विकेट्स घेतल्या आहेत. एका वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक तीनवेळा पाच विकेट घेणारा शमी हा एकमेव गोलंदाज आहे.

विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक २८ षटकार षटकारांचा रेकॉर्ड रोहित शर्मा याने आपल्या नावावर केला, जो आधी वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेल (२६ षटकार) याच्या नावावर आहे. विशेष म्हणजे रोहितनंतर २४ षटकारांसह भारताचाच श्रेयस अय्यर तिसऱ्या स्थानी आला आहे.

(छाया : धम्मशील सावंत)



# आदिवासी समाजाच्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत कातळावाडी संघ विजेता

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील कवेलेवाडी येथे जय गावदेवी कबड्डी मंडळाच्या वतीने आदिवासी ठाकूर व कातकरी समाजाच्या जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत कातळावाडी, रोहा संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत जिल्ह्यातील ४० संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेतील अंतिम लढत कातळावाडी विरुद्ध गौळावाडी, पेण या संघांत झाली. दोन्ही संघांतील खेळाडूंनी बहारदार खेळ केला. यामध्ये कातळावाडी संघाने बाजी मारली. पायरवाडी रोहा संघ तृतीय व शेणे पेण संघ चतुर्थ क्रमांकांचा मानकरी ठरला.

स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईपटू अरविंद हंबीर, तर उत्कृष्ट पकड करणारा खेळाडू अंकुश वाघमारे ठरला. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना सरपंच दिपिका सुतार यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेवेळी गणेश चोरगे, गार्गी चोरघे, भालचंद्र पार्टे, मोरू निरगुडे, गणपत भला, राम भला, पद्माकर भला, शंकर भला, प्रकाश वाघ, गणेश भला व रघुनाथ भला यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्याचा कुस्ती संघ राज्य स्पर्धेसाठी धाराशिवला रवाना



**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेतर्फे ६५वी वरिष्ठ गट महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा १६ ते २० नोव्हेंबर या कालावधीत धाराशिव येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा माती गादी विभागासाठी निवडण्यात आलेला कुस्ती संघ जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष तथा राष्ट्रीय कुस्तीगीर सुभाष घासे व सरचिटणीस तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त मारुती आडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रवाना झाला आहे. या संघास रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष बळीराम पाटील यांनी शुभेच्छा दिल्या

**संघ पुढीलप्रमाणे :**

माती विभाग : ५७ किलो श्रीनाथ पाटील अलिबाग, ६१ कि. साजन पावसे पनवेल, ६५ कि. ओंकार गायकर पनवेल, ७० कि. किरण ढवळे पनवेल, ७४ कि. श्रेयस करे पनवेल, ७९ कि. जयेश खरमारे खालापूर, ८६ कि. शुभम वरखडे पनवेल, ९२ कि. विकास पावसे पनवेल, ९७ कि. कुणाल शेळके पनवेल, १२५ कि. निमीष घरत अलिबाग.

गादी विभाग : ५७ किलो सोहेल शेख खालापूर, ६१ कि. रवींद्र चौधरी पनवेल, ६५ कि. आदेश मढवी पनवेल, ७० कि. सुनील खंदाळे खालापूर, ७४ कि. दिवेश पालांडे खालापूर, ७९ कि. ओंकार निंबळे खालापूर, ८६ कि. यश कडवे अलिबाग, ९२ कि. शंकर जाधव पनवेल, ९७ कि. कुलदिप पाटील अलिबाग, १२५ कि. ऋषिकेश देशमुख खालापूर, संघ व्यवस्थापक प्रविण भोपी पनवेल.

# एलआयसी-आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धेत रुद्र, टंडन, लक्ष्य गटविजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

एलआयसी-आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धेतील विविध तीन वयोगट मुलांमध्ये फिडे गुणांकित बालबुध्दिबळपटू रुद्र कंदपाल, टंडन यश भरत, लक्ष्य मिहीर दिघे आणि मुलींमध्ये आराध्या पुरो, विआना पंजाबी, गिरीशा पै यांनी गटविजेतेपद पटकाविले.

१२ वर्षाखालील मुलांमध्ये स्विस लीग पद्धतीने चुरशीच्या पाच लढती होऊन रुद्र कंदपालने (चार गुण) फिडे गुणांकित लोबो फेरडीनचे (चार गुण) आव्हान उत्तम सरासरीच्या बळावर मागे सारले आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत स्पर्धेमध्ये रुद्रने १२ वर्षाखालील मुलांचे गटविजेतेपद जिंकले. परिणामी लोबोला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. फिडे गुणांकित प्रदीप हाथीने (३.५ गुण) तृतीय क्रमांक मिळविला. १२ वर्षाखालील मुलींमध्ये गिरीशा पैने (३.५ गुण) प्रथम, आर्या नाईकने (तीन गुण) द्वितीय आणि जीयाना धरमसीने (तीन गुण) तृतीय स्थानावर झेप घेतली.



एलआयसी-आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धेतील १० वर्षाखालील मुलांमध्ये फिडे गुणांकित अपराजित टंडन यश भरतने (पाच गुण) प्रथम, अद्वैत मयेकरने (चार गुण) द्वितीय, अथर्व सिन्हाने (तीन गुण) तृतीय तर मुलींमध्ये विआना पंजाबीने (तीन गुण) प्रथम, साईशा मुळेने (तीन गुण) द्वितीय, आद्या कश्यपने (दोन गुण) तृतीय पुरस्कार हासील केला.

आठ वर्षाखालील मुलांमध्ये फिडे गुणांकित अपराजित लक्ष्य दिघेने (पाच गुण) प्रथम, कॅलेब सिडन्हॅमने (चार गुण) द्वितीय, लोबो दैतीनने (चार गुण) तृतीय तर मुलींमध्ये आराध्या पुरोने (तीन गुण) प्रथम व स्वरा खटावकरने (एक गुण) द्वितीय स्थान मिळविले. स्पर्धेला आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना यांचे सहकार्य लाभले होते.

ज्येष्ठ क्रीडा पत्रकार सुहास जोशी व नवनाथ दांडेकर, बुद्धिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, मनोहर गोराठे, संजय पेडणेकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ झाला.

# शुबमन म्हणतो, विराटकडून प्रेरणा अन् रोहितकडून शिकायला मिळते!

**मुंबई : प्रतिनिधी**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या पहिल्या उपांत्य फेरीत भारताने न्यूझीलंडचा ७० धावांनी पराभव केला. त्याचबरोबर या विजयासह अंतिम फेरीत धडक मारली. या सामन्यानंतर भारताचा युवा सलामीवीर शुबमन गिलने प्रतिक्रिया दिली. शुबमन गिल म्हणाला, मला क्रॅम्प्स आले नसतो, तर कदाचित मी शतक झळकावू शकतो. त्याचबरोबर शुबमन म्हणाला, विराट कोहलीची धावांची भूक आणि समर्पण त्याला प्रेरणा देते, तसेच जेव्हा तो कर्णधार रोहित शर्मासोबत क्रीजवर असतो, तेव्हा त्याच्याकडून खूप काही शिकायला मिळते.

उपांत्य फेरीच्या सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर शुबमन गिल आणि रोहित शर्मा पुन्हा एकदा भारताला शानदार सुरुवात करुन देण्यात यशस्वी ठरले, मात्र तीव्र क्रॅम्पमुळे शुबमन गिलला सामन्याच्या मध्यभागी मैदान सोडावे लागले. त्यानंतरही शुबमन फलंदाजीसाठी आला होता, पण त्याला आपले शतक पूर्ण करता आले नाही. तो ८० धावांवर नाबाद राहिला. तरीही भारताने न्यूझीलंडविरुद्ध ३९७ धावांची मोठी धावसंख्या उभारली.



### शतक केले किंवा नाही केल्याने काही फरक पडत नाही

शुबमन दुखापतीबद्दल बोलताना म्हणाला की, याची सुरुवात क्रॅम्प्सने झाली आणि नंतर माझ्या हॅमस्ट्रिंगमध्ये थोडा ताण आला. ते खूप वेदनादायक होते. डेंग्यूनंतरची ही सर्वांत वाईट भावना होती. मला क्रॅम्प्स आले नसते, तर मी कदाचित १०० धावा पूर्ण केल्या असत्या. भले मी शतक पूर्ण केले असो किंवा नसो, परंतु मला वाटते की आम्ही ज्या धावसंख्येपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत होतो, तिथे आम्ही पोहचलो. आम्हाला ४००च्या आसपास धावा करण्याची अपेक्षा होती. २५व्या आणि ३०व्या षटकापर्यंत आम्ही जितक्या धावा करायला हव्या होत्या तितक्या धावा आम्ही केल्या. त्यामुळे मी शतक केले किंवा नाही केले या गोष्टीने काही फरक पडत नाही.

शुबमन गिल म्हणाला, विराट आणि त्याच्या फलंदाजीत काही साम्य आहे. तो म्हणाला, 'प्रामाणिकपणे सांगायचे तर, आम्ही क्रीजवर परिस्थिती आणि खेळ कसा पुढे चालवायचा याबद्दल बोलतो. मला वाटते की त्यांच्या आणि माझ्या शैलीत काही साम्य आहे, कारण आम्हा दोघांना स्कोअर बोर्ड चालता ठेवायला आवडते.

रोहित शर्मासोबत फलंदाजी करताना काहीतरी नवीन शिकायला मिळते, असेही गिल म्हणाला. तो म्हणाला, 'त्यांच्याशी संबंधित प्रत्येक गोष्ट मला प्रभावित करते. पॉवर प्लेमध्ये मी एक विद्यार्थी म्हणून त्याच्यासोबत उभा राहतो. ते १० षटके खेळतात आणि मी १५ ते २० चेंडू खेळतो. मी आरामात खेळतो, कारण ते येताच त्यांचे काम सुरू करतात. ते चौकार आणि षटकार मारत असतात आणि मी फक्त त्यांना पाहत असतो.

## 'वानखेडे'ची खेळपट्टी खूप चांगली होती -विल्यमसन

**मुंबई : प्रतिनिधी**

विश्वचषक स्पर्धेतील पहिला उपांत्य सामना जिंकून भारताने फायनलमध्ये धडक मारली आहे. हा सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळला गेला. सामन्यात वापरण्यात आलेल्या खेळपट्टीबाबत चर्चा झाली. न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यमसननेही यावर प्रतिक्रिया दिली आहे.

सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत केन विल्यमसन म्हणाला, जरी ती वापरलेली खेळपट्टी असली, तरीही खेळपट्टी खूप चांगली होती आणि भारतीय खेळाडूंनी फलंदाजी करताना त्याचा पुरेपूर फायदा घेतला. त्याचवेळी संध्याकाळपर्यंत परिस्थिती बदलल्याचे पाहायला मिळाले, पण तरीही आम्ही खरोखरच चांगला खेळ केला.

## बाबरने कर्णधारपद सोडून फलंदाजीवर लक्ष केंद्रित करावे

### पाकच्या माजी क्रिकेटपटूंचे मत

**कराची : वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील निराशाजनक कामगिरीनंतर बाबर आझमने पाकिस्तान संघाचे कर्णधारपद सोडावे आणि आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करावे, असे मत शोएब मलिक, कमरान अकमल आणि अब्दुल रझाक यांसारख्या काही माजी क्रिकेटपटूंनी व्यक्त केले आहे.



बाबरच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान संघाला यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत नऊपैकी केवळ चार सामने जिंकता आले. त्यामुळे पाकिस्तानचे आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात आले. त्यातच बाबरला कर्णधार आणि फलंदाज म्हणून प्रभाव पाडता आला नाही. त्यामुळे आता त्याचे कर्णधारपद धोक्यात आले आहे.

'मी बाबरच्या विरोधात नाही, पण आता त्याने ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे. फलंदाज म्हणून त्याला अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. कर्णधारपदाचा त्याच्या फलंदाजीवर परिणाम होत आहे. त्यामुळे कर्णधार आणि प्रमुख फलंदाज या दोन्हीचे दडपण हाताळण्यासाठी आपण सक्षम आहोत का, याचा त्याने निश्चित विचार केला पाहिजे,' असे मलिक म्हणाला. बाबर २०१९पासून पाकिस्तानचे नेतृत्व करत आहे. कर्णधार म्हणून स्वत:ला सिद्ध करण्यासाठी चार वर्षे पुरेशी असतात, मात्र बाबरने निराशा केली आहे, असे रझाकला वाटते.

## भारत-न्यूझीलंड मॅचच्या तिकिटांचा काळाबाजार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रंगलेल्या भारत विरुद्ध न्यूझीलंड सेमीफायनलची तब्बल ७० टक्के तिकिटे काळ्या बाजारात विकली गेल्याचा धक्कादायक तपशील समोर आला असून पोलिसांनी या प्रकरणी दोन जणांना अटकही केली आहे.

**दोन जण अटकेत**

रोशन गुरुबक्षानी व आकाश कोठारी अशी मुंबई पोलिसांनी अटक केलेल्या व्यक्तींची नावे आहेत. वृत्तानुसार आकाश व रोशन हे टीम इन्नोव्हेशन या इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीसाठी काम करतात. ही कंपनी म्युझिक फेस्टिव्हल, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पोर्ट्स इव्हेंट्सचे आयोजन करते. रोशन व आकाश या दोघांकडे तिकीट विक्री करणाऱ्या कंपन्यांचे लॉगइन डिटेल्स होते. या माध्यमातून त्यांनी सामन्याची ७० टक्के तिकिटे ब्लॉक केली आणि नंतर त्या तिकिटांची काळ्या बाजारात विक्री केली. आकाश ऑनलाईन तिकिटांची विक्री करायचा, तर रोशन ही तिकीटे उपलब्ध करून द्यायचा. या सर्व प्रकरणात एक मोठे रॅकेट काम करत असून अशा मोठ्या इव्हेंट्सच्या तिकिटांचा असाच काळा बाजार होत असल्याचा संशय पोलिसांना असून त्या दिशेने पोलिसांचा तपास चालू आहे.

# रोहितने भारतीय संघाची खेळण्याची पद्धतच बदलून टाकली

## इंग्लंडच्या माजी कर्णधाराकडून कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

सेमीफायनलमध्ये ३९७ धावांचा डोंगर उभा केल्यानंतर न्यूझीलंडला ७० धावांनी पराभूत करीत भारताने दिमाखात वर्ल्डकप फायनलमध्ये प्रवेश केला आहे. येत्या रविवारी अहमदाबाद स्टेडियमवर विश्वचषकाचा अंतिम सामना होणार आहे, मात्र सध्या भारताने न्यूझीलंडला पराभूत करत २०१९ वर्ल्डकपचा वचपा काढल्याची जोरदार चर्चा चालू आहे. सगळ्यांच्या तोंडी विराट, अय्यर, शमीची नावे रेंगाळत असताना इंग्लंडचा माजी कर्णधार नासिर हुसेनने भारताच्या विजयाचे श्रेय कर्णधार रोहित शर्माला दिले आहे.

नासिर हुसेनने सामना संपल्यानंतर एका वाहिनीवर दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये विराट



कोहली, मोहम्मद शमी किंवा श्रेयस अय्यरपेक्षाही रोहित शर्मा सामन्याचा खरा हिरो असल्याची प्रतिक्रिया दिली आहे. या सामन्याच्या बातम्यांसाठी कदाचित वृत्तपत्रांमध्ये हेडलाईन्समध्ये विराट कोहली, श्रेयस अय्यर आणि मोहम्मद शमी असतील, पण या भारतीय संघाचा खरा हिरो कुणी असेल, तर तो रोहित शर्मा आहे. रोहितने या भारतीय संघाची खेळण्याची पद्धतच बदलून टाकली आहे, असे नासिर म्हणाला.

### रोहितच सेमीफायनलचा खरा हिरो!

मला वाटते रोहित शर्माच विजयाचा खरा हिरो आहे. लीग फेरीची गणिते वेगळी असतात, पण नॉकआऊट सामन्याचे दडपण वेगळे असते. रोहित शर्माने त्याच्या सलामीच्या खेळीने हे दाखवून दिले की, लीग फेरीप्रमाणेच ते नॉकआऊट सामन्यांमध्येही आक्रमक खेळ करू शकतात. रोहितने कशा पद्धतीने खेळायचे याचा आदर्शच इतर फलंदाजांना घालून दिला, असेही नासिर हुसेनने नमूद केले.

गेल्या वर्षी जेव्हा ॲडलेडवर झालेल्या टी-२० वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये इंग्लंडने भारताचा पराभव केला होता, तेव्हा दिनेश कार्तिक त्या संघाचा भाग होता. त्या वेळी भारताची कामगिरी निराशाजनक झाली होती. फलंदाजांची कामगिरीही ढेपाळली होती. इंग्लंडने भारताचा तब्बल १० विकेट्सने पराभव केला होता. तेव्हा रोहित शर्माने दिनेश कार्तिकला म्हटले होते की संघाने खेळायची पद्धत बदलायला हवी, अशी आठवणही नासिरने या वेळी सांगितली.

रोहित शर्माने यंदाच्या वर्ल्डकपमध्ये ज्या प्रकारे सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली त्याचा टीम इंडियाला फायदा झाल्याचे मत नासिरने व्यक्त केले आहे. सेमीफायनलमध्ये रोहितने सलामीला फक्त २९ चेंडूंमध्ये ४७ धावा कुटल्या. शिवाय मधल्या ओव्हर्समध्ये धावांची गती कमी झाली असतानाही रोहितने भारतीय फलंदाजांना गती वाढवण्याचा संदेश दिला, यावर नासिरने भर दिला आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com